
# गाऊया तेजाची आरती

डॉ. अनिल गोडबोले



BVBK-0402877

वासुदेव बळवंत फडके

कां०वा.
२८७७
१।१।६४

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २८७७ दिनांक १।१।६४
विषय कां. वा. क्र.

# वासुदेव बळवंत

डॉ. अनिल गोडबोले

BVBK-0402877

उन्मेष प्रकाशन

उन्मेश प्रकाशन (९८)

वासुदेव बळवंत
(गाऊया तेजाची आरती - २)

प्रकाशक - मुद्रक
मेधा राजहंस
उन्मेष प्रकाशन
२६ पर्वती, पुणे ४११ ००९

© डॉ. अनिल गोडबोले
३७९, शनिवार पेठ,
लिमये बिल्डींग

मूल्य : तीस रुपये.

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट १९९३

मुखपृष्ठ
धनंजय सस्तकर

आतील चित्रे
डॉ. भैय्यासाहेब ओंकार

टाईपसेटिंग
पॉप्युलर टाईपरायटिंग रुम
६५२ नारायण पेठ,
अप्पा बळवंत चौक,पुणे ४११०३०
फोन नं ४५१७५०.

# अनुक्रमणिका


आधी हे वाचा !

१. आम्ही पेशव्यांचे सरदार

२ .बंडखोर वासुदेव

३. त्या काळातील पुणे

४. मातृवियोग

५ .सनदशीर मार्गाने काय साधणार ?

६. घे शस्त्र आणि हो पुढे !

७. ' वासुदेव बळवंत ' नावाचे वादळ

८. निराशेच्या खोल गर्तेत

९. सिंह जाळ्यात अडकला

१०. काकांनी पुण्याचे नाव राखले

११. अखेरचा हा तुला दंडवत !

१२. केवढे हे धाडस !

१३. अखेर मृत्यूनेच सोडवले

१४. गोपिकाबाईंची व्यथा

- वासुदेव बळवंतांचे न्यायालयातील निवेदन.
- वासुदेव बळवंतांच्या जीवनातील प्रसंग-विशेष.
- हे सुद्धा वाचायला हवे !

# आधी हे वाचा !

" काय, इंग्रजांचं राज्य उलथवून टाकायचं ? या काय तोंडच्या गप्पा आहेत ?"

" अहो, यांना वेड तर लागलं नाही ना ?"

" या गोऱ्या साहेबानं आमचं काय वाईट केलं ? परमेश्वरानं या देवदूताला आमच्यांत सुधारणा व्हावी यासाठी पाठवलंय."

पुण्यातील शनिवारवाड्यासमोर उभे राहून, वासुदेव बळवंत लोकांना इंग्रजांविरुद्धच्या सशस्त्र बंडात सहभागी होण्याचे आवाहन करीत, त्या वेळी सभेला जमलेल्या पुणेकरांत, या अशा प्रकारची कुजबूज चालत असे. पुणे तिथे काय उणे, असे आपण अभिमानाने सांगत असतो, पण त्या काळात पुण्यातील सुशिक्षितांकडून वासुदेव बळवंतांच्या आवाहनाला असा विचित्र प्रतिसाद मिळाला. १८५७ चे स्वातंत्र्य-युद्ध नुकतेच संपून गेले होते. इंग्रजी सत्तेविरुद्ध देशाच्या निरनिराळ्या भागांत उठाव करण्याचे झालेले प्रयत्न इंग्रजांनी, कधी सैन्यबळाच्या जोरावर, तर कधी ' फोडा आणि झोडा ' या भेदनीतीचा अवलंब करून हाणून पाडले होते. इंग्रजांविरुद्ध बंड किंवा उठाव करण्याची गोष्ट दूरच, पण आम्ही गुलामगिरीत आहोत, परकीय लोक आमच्यावर राज्य करतात, ही जाणीव सुद्धा पुसट होऊ लागली होती. या पार्श्वभूमीवर, एक मर्दानी मराठी तरुण उघडपणे, इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंडात सहभागी होण्याचे आवाहन करतो, ही गोष्टच केवढी धाडसाची आहे. वासुदेव बळवंतांचे चित्र अनेकांच्या पाहण्यात आले आहे. ते बलदंड शरीर, दाढी वाढवलेला उग्र चेहरा आणि शत्रूवर रोखलेले ते तेजस्वी डोळे, हे सारे पाहिल्यानंतर या क्रांतिकारकात, सशस्त्र

क्रांतीचे आव्हान पेलण्याची हिंमत होती, या बद्दल तिळमात्र शंका वाटत नाही. पुण्यातील सुशिक्षित समाज जरी उदासीन राहिला, तरीही रामोशी, कोळी, आदिवासी यांनी वासुदेव बळवंतांच्या हाकेला ओ दिली. अल्पकाळ का होईना, पण इंग्रज राज्यकर्त्यांच्या मनात धडकी निर्माण व्हावी, असे कर्तृत्व वासुदेव बळवंताचे होते. एखाद्या दंतकथेत शोभाव्या अशा काही घटना त्यांच्या आयुष्यात घडल्या. त्यांचे बंड जरी अल्पजीवी ठरले, तरी पुढे एडनच्या तुरुंगातून मोठ्या हिंमतीने स्वत:ची सुटका करून घेण्याचा केलेला धाडसी प्रयत्न आणि अखेर त्याच तुरुंगात जन्मठेपेच्या यातना भोगत असताना त्यांनी केलेले आत्मसमर्पण, यामुळे ' वासुदेव बळवंत ' या नावाला एक वेगळेच परिमाण लाभले.

वासुदेव बळवंतांच्या कार्याचे मोल आम्हाला दुर्दैवाने त्यांच्या मृत्यूनंतर उमगले. आजच्या काळात देशभक्ती आणि त्याग हे गुण दिवसेंदिवस दुर्मिळ होत चालले असताना, वासुदेव बळवंतांची ही जीवनकथा आमच्या जीवनांत काही प्रमाणात चैतन्य निर्माण करू शकेल अशी आशा आहे. गेल्या वीस वर्षात मी सुमारे दोनशे ठिकाणी वासुदेव बळवंतांची जीवनकथा लहानांसमोर, तसेच मोठ्यांसमोरही सांगितली. खुद्द वासुदेव बळवंतांच्या जन्मगावी, तेथील ग्रामस्थांसमोर आणि मुलांसमोर ही जीवनकथा ऐकवली. ऐकणाऱ्यांच्या मनावर या कथेचा विलक्षण परिणाम होतो, असा प्रत्यक्ष अनुभव आहे. त्यामुळेच जशी सांगतो, त्याच पद्धतीने ती आज सर्व स्तरांतील वाचकांसाठी लिहून काढली आहे.

पुस्तक-लेखनासाठी प्रकाशिका मेधा राजहंस यांच्याकडून वेळोवेळी सतत प्रोत्साहन मिळत आहे. निरनिराळ्या ग्रंथालयांनी वासुदेव बळवंतांबाबतची जुन्यांतील जुनी पुस्तके उपलब्ध करून दिली. पुस्तकाची हस्तलिखित प्रत तयार करण्याचे काम विद्या दातार व विशाखा दातार यांनी मोठ्या आस्थेवाईकपणे व कमीत कमी वेळात करून दिले. डॉ भय्यासाहेब ओंकार यांच्या चित्रांमुळे या पुस्तकाची रंगत वाढली आहे. केवळ उपचार म्हणून आभार मानलेले त्यांनाही रुचणार नाही, कारण ही सगळी आमचीच माणसे आहेत. मी त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करीन. या चरित्रकथेचे, जाणकार वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे.

- अनिल गोडबोले

# “ आम्ही पेशव्यांचे सरदार ! ”

सुमारे पावणेदोनशे वर्षांपूर्वीचा काळ डोळ्यांसमोर आणा. १८१८ हे वर्ष तमाम भारतीयांच्या दृष्टीने शोककारक ठरले. याच वर्षापासून स्वातंत्र्य हळूहळू नष्ट होऊ लागले.

१६ नोव्हेंबर, १८१७ च्या मध्यरात्री पुण्यातील इतिहासप्रसिद्ध शनिवारवाड्यावर इंग्रजांचे युनियन जॅक फडकू लागले. शिवछत्रपतींच्या नंतर स्वराज्याचे शत्रूपासून रक्षण करणारा, तशा ताकदीचा एकही नेता निर्माण झाला नाही. पेशव्यांनी एकेकाळी अटकेपार झेंडे रोवले, पण दुसऱ्या बाजीरावाने शनिवारवाड्यातून पळ काढल्यामुळे, आता पेशवाईचाही अस्त झाला. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या इंग्रजांनी, त्यांचा इथे राज्य बळकावण्याचा हेतू आता उघडपणे जाहीर केला. एका प्रदीर्घ अशा काळरात्रीची सुरुवात झाली. काही ना काही कुरापती काढून, कुठे अंतर्गत दुहीला प्रोत्साहन देऊन, तर कधी थातुरमातुर गोष्टीचे आमिष दाखवून हळूहळू इंग्रजांनी इथला मुलूख काबीज करायला सुरुवात केली. आमच्यांतल्याच काही महाभागांनी निव्वळ स्वार्थ साधण्यापोटी, फितुरी करून इंग्रजांना आपल्या घरात प्रवेश करू दिला. इंग्रजांकडे शिस्त होती. आधुनिक शस्त्रास्त्रे होती. इतरही अनेक प्रकारची गुणसंपदा त्यांच्याकडे होतीच. हे सारे मान्य करूनही या देशाचे स्वातंत्र्य गेले याला आमच्यांतलेच अवगुण कारणीभूत आहेत, हे विसरून चालणार नाही.

वासुदेव बळवंतांचे जन्मगाव शिरढोण, हे अगदी पूर्वी ठाणे जिल्ह्यात, नंतर कुलाबा जिल्ह्यात व आता रायगड जिल्ह्यात येते. पनवेल-पेण मार्गावरील

पनवेलपासून साडेपाच कोस अंतरावरील हे तालुक्याचे गाव. गावाच्या मध्यभागीच फडक्यांचा भव्य असा वर्तुळाकृती वाडा. उदरभरणासाठी कोकणातून देशाकडे जी काही घराणी आली, त्यांतीलच एक फडक्यांचे घराणे. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी शिरढोणला आले असावे, असा अंदाज आहे. शिरढोण जवळच्या ऐतिहासिक कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदारपद, या घराण्यातील अनंतराव फडक्यांकडे होते, असे ऐतिहासिक कागदपत्रांवरून दिसते. किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर उर्दू भाषेत लिहिलेल्या लेखावरून मुसलमानी आमदानीत हा किल्ला फडके-घराण्याकडेच होता, हे दिसून येते. दुरून पाहिल्यावर हा किल्ला एखाद्या डोंगराच्या शिखरासारखा दिसतो. कर्नाळा किल्ल्यावर चढण्याची वाट अगदी चिंचोळी, किल्ला तसा बिकट. अर्थात् हे निसर्गाचेच वरदान. पण या किल्ल्याकडे इंग्रजांची वक्रदृष्टी वळली. इतर अनेक किल्लेदारांप्रमाणे, कर्नाळा किल्ल्याचे त्या वेळेचे किल्लेदार अनंतराव फडके यांना इंग्रजांचे कडक फर्मान आले. किल्ला खाली करण्याची इंग्रजांनी आज्ञा केली. अनंतराव फडके स्वाभिमानी आणि तेजस्वी बाण्याचे. हा अपमान त्यांना सहन झाला नाही. त्यांनी इंग्रजांना उलट निरोप धाडला, " कोणाचा किल्ला आणि कोण खाली करायला सांगतो ? आम्ही पेशव्यांचे सरदार, फक्त पेशव्यांचाच हुकूम मानतो."

एका कवीने अनंतरावांचे हे उद्‌गार -

" करनाळा कवणाचा, स्वाधीन करा कथी मला कवण." असे काव्यात गुंफले आहेत. देशात इंग्रजी सत्तेपुढे भल्याभल्यांचा पाडाव होत असताना, एक तेजस्वी पुरुष " मी किल्ला देत नाही " असे इंग्रजांना ठणकावतो, हा प्रसंग त्या काळचा विचार करता, लोकविलक्षणच म्हणावा लागेल. " मेरी झाँसी नही दूँगी " असे म्हणणाऱ्या झाशीवालीचा आणि अनंतराव फडक्यांचा पिंड एकच. या निरोपाचा काय परिणाम होणार याची अनंतरावांना पूर्ण जाणीव होती. पण तरीही त्यांनी इंग्रजांविरुद्ध दोन हात करण्याची तयारी दर्शवली. इंग्रजी सैन्याने किल्ल्याला वेढा दिला. अनंतरावांकडे सैन्यबळ इंग्रजांच्या तुलनेने कमीच. इंग्रजांकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, मोठ्या प्रमाणात सैन्यबळ, उत्तम नेतृत्वगुण आणि शिस्तबद्ध आखणी. या साऱ्यामुळे कर्नाळा किल्ला सर झाला नसता, तरच

नवल. पण तशाही प्रतिकूल वातावरणात अनंतरावांनी मोठ्या जिद्दीने तीन दिवस हा किल्ला झुंजवला. विशेष म्हणजे त्या वेळी अनंतरावांचे वय होते ५८ वर्षांचे. हे अनंतराव फडके म्हणजेच चरित्रकथेचे नायक, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा. वासुदेव बळवंतांच्या क्रांतिकार्यामागे त्यांच्या आजोबांकडून आलेला हा गुणवारसा असणार यात काय संशय !

***

# बंडखोर वासुदेव

बहुतेक मोठी माणसे ही लहानपणी हूड, खोड्या करणारी आणि बंडखोर असतात का ? बालवयातल्या या लीला पाहून ती त्यांच्या पालकांच्या काळजीचा विषय होतात. पण त्यांचे खरे कर्तृत्व मोठेपणी दिसते.

पेशव्यांच्या काळापासूनच फडके घराणे मातब्बर म्हणून प्रसिद्ध होते. अनंतराव फडके हे स्वत: तर कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार म्हणून सर्वत्र मानाने वावरले. शिरढोण भागातील सर्वजण त्यांना किल्लेदार म्हणूनच ओळखत. शिरढोणला त्यांचा प्रशस्त वाडा, गोठ्यात शे-दीडशे दुभती जनावरे, पागेत उमदे घोडे. अनंतराव दशग्रंथी ब्राह्मण. स्वकष्टाने त्यांनी साठ खंडी भाताची शेती मिळवली. आपल्या शेत-जमिनीत त्यांनी तीन हजार झाडे लावली होती. अशा ऐश्वर्यसंपन्न घराण्यात वासुदेव बळवंताचे वडील बळवंतराव वाढले. किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला, तरी शिरढोण भागातील लोक फडक्यांना सुभेदार फडके म्हणूनच ओळखत. बळवंतराव त्यांच्या आवडत्या घोड्यावरून रोज रपेट करत. बळवंतरावांचा विवाह बोरगावकरांच्या कन्येशी झाला. सासरी त्या सरस्वतीबाई म्हणूनच ओळखल्या जात. अशा या दाम्पत्याच्या पोटी ४ नोव्हेंबर, १८४५, या दिवशी आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंतांचा जन्म झाला. बारसे अगदी थाटामाटात झाले. गोरापान रंग, निळे डोळे, धारदार नाक, भव्य कपाळ आणि बाळसेदार शरीर यामुळे लहानपणापासूनच वासुदेव सर्वांना हवाहवासा वाटायचा.


वासुदेवाला लहानपणी अनंतराव फडके आणि सरस्वतीबाईंचे वडील अप्पासाहेब बोरगावकर, अशा दोन्ही आजोबांचा भरपूर सहवास आणि प्रेम मिळाले. विशेषत: अनंतरावांमधील बरेचसे गुणविशेष नातवाने उचलले. सुरुवातीची दोन-अडीच वर्षे वासुदेव शिरढोणला अनंतरावांच्या सहवासात वाढला. पुढे काही दिवस आजोळी राहिल्याने त्याला बोरगावकर आजी-आजोबांचे खूप प्रेम मिळाले.

वासुदेवाच्या लहानपणच्या खोड्या व बंडखोरपणा पाहून अनंतराव त्याला ' छकड्या ' म्हणूनच हाक मारत. वासुदेव चार-पाच वर्षांचा झाला. आपल्या मुलाने लवकर लवकर शिकावे, म्हणून त्याचे वडील त्याच्यामागे धूळपाटी घेऊन हिंडत, व बाराखडी काढायला लावत. पण वडिलांची पाठ फिरली की, वासुदेव मित्रांबरोबर हुंदडायला जायचा. मित्रांबरोबरच्या त्याच्या खोड्या पाहून, या मुलाचे पुढे कसे होणार, अशी वडिलांना काळजी वाटे. वासुदेवाचा हूडपणा थोडा कमी व्हावा म्हणून वडिलांनी त्याची वयाच्या सहाव्या वर्षी मुंज लावून दिली. पण वासुदेवाची बंडखोरी कुठेही कमी झाली नाही. आईवर तर वासुदेवाचे विलक्षण प्रेम. लाडाने तो तिला सरस्वती म्हणून हाक मारायचा.

पावसळ्याचे दिवस. कल्याणजवळील उल्हास नदीला पूर आला. बोरगावकरांच्या वाड्याच्या अंगणातही पाणी आले. पण सकाळपासून छोट्या वासुदेवाचा पत्ता नव्हता. आईचे चित्त थाऱ्यावर नव्हते. " कुठे गेला माझा वासुदेव ? सकाळपासून दिसत नाही. पुरामध्ये पोहायला तर गेला नाही ना ?" असे त्या येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकालाच विचारत. दुपार टळली तरी वासुदेवाचा पत्ता नाही म्हटल्यावर, या माउलीचा धीर खचला. इतका वेळ आवरून धरलेला अश्रूंचा बांध फुटला. " मला माझ्या वासुदेवाला भेटवा " म्हणून त्यांनी हमसून हमसून रडायला सुरुवात केली. छोटा वासुदेव घरातच हडप्याच्या मागे लपून सारी गंमत पहात होता. पण आईला रडताना पाहिल्यावर त्याला राहवले नाही. तो पटकन् पुढे झाला. " अगं आई, मी इथंच आहे " असे म्हणत त्याने आईच्या गळयाला मिठी मारली. आईचे डोळे पुसू लागला. वासुदेवाला पाहिल्यानंतर आईच्या जिवात जीव आला. " वासुदेवा, किती रे असा त्रास देशील ? पुन्हा

अशी थट्टा करायची नाही. माझ्या जिवाला किती घोर लागून राहिला." झाला प्रकार विसरून ती मायलेकरे आनंदाने गप्पा गोष्टी करू लागली.

वासुदेवाच्या हूडपणाबद्दल वडिलांना फार काळजी. पण अनंतरावांना मात्र त्याचा हा हूडपणा आवडायचा. ते नेहमी म्हणायचे, " मुलांनी देवासारखं गप्प बसावं हे मला मुळीच आवडत नाही. खोड्या मुलांनी करायच्या नाहीत, तर मग काय मोठ्यांनी करायच्या ? हूड आहे, बंडखोर आहे, हेच बरे आहे." अनंतरावांनी छोट्या वासुदेवासाठी बोकडाची गाडी तयार करून दिली होती. या गाडीत बसून वासुदेव गावभर भटकून यायचा. आजोबांना बागकामाचा खूप छंद. वृद्धापकाळातील अपघातात त्यांचे पाय गेले. पण तरीही बागेमध्ये झाडे लावण्याचे काम त्यांचे चालूच असायचे. आंब्याची रोपे लावताना ते छोट्या वासुदेवाला नेहमी बरोबर घेत. वासुदेव आजोबांना सतत प्रश्न विचारायचा.
" आजोबा ही आंब्याची रोपे तुम्ही कशाला लावता ?"
" कशाला म्हणजे ? आपल्याला आंबे खायला मिळावेत म्हणून."




आजोबा म्हणाले, " आपण बीज पेरत रहावं,
त्याची फळे आपल्या पुढच्या पिढीला मिळतील. "

" पण आजोबा, तुम्ही तर आता म्हातारे झालात. ही आंब्याची झाडे मोठी केव्हा होणार ? त्याला आंब्याची फळे केव्हा येणार ? आणि ते आंबे तुम्हाला कसे खायला मिळणार ?"

" हे बघ वासुदेवा, मी आंब्याची झाडे लावतो, त्याची फळे मलाच मिळायला हवीत असा हट्ट का धरावा ? आपण बीज पेरत रहावं, त्याची फळं आपल्या पुढच्या पिढीला तरी नक्की मिळतील."

अनंतरावांच्या बोलण्यातला आशय बाल वासुदेवाला कितपत समजला असेल ? पण हा छोटासा प्रसंग अतिशय बोलका आणि त्याच्या जीवनातील भावी घटनांची नांदी ठरणारा आहे. वासुदेव बळवंतांचे बंड अल्पजीवी ठरले, पण म्हणून हा सारा खटाटोप व्यर्थ होता असे कसे म्हणता येईल ? स्वराज्याचे स्वप्न पुरे झाल्याचे पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही. पण त्यांच्या जीवनापासून अनेक क्रांतिकारकांना देशभक्तीची प्रेरणा मिळाली. या साऱ्यांच्या प्रयत्नांचे फळ म्हणजेच १९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य. स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ या क्रांतिकारकाने रोवली. त्याची फळे पुढच्या पिढीला मिळाली.

वासुदेवाला कल्याण येथील प्राथमिक शाळेत घातले. शाळेतल्या पंतोजींच्या छडीच्या धाकामुळे वासुदेवाला अभ्यासात फारसा रस नव्हता. इतर विषयांबाबत त्याला काय वाटत होते माहीत नाही, पण इंग्रजांविरुद्ध बंड करणाऱ्या या क्रांतिकारकाच्या मनात इंग्रजी भाषेबद्दल कसे प्रेम निर्माण झाले? याचे आश्चर्य वाटते. फडक्यांचे घराणे सनातनी, त्यामुळे इंग्रजी शिकण्याला घरातून तसा विरोधच. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत श्रीधरशास्त्री जांभेकर हे इंग्रजीचे शिक्षक. स्वभावाने अतिशय प्रेमळ आणि मुलांना शिकवताना छडीचा कमीत कमी वापर करायचे. इंग्रजी शिकण्यासाठी वासुदेव जांभेकरांच्या वर्गात बसू लागला. पहिल्याच दिवशी त्याला गुरुजींनी विचारले,

" तुला इंग्रजी शिकायचंय ?"

" होय गुरुजी."

" पण तुझ्या पालकांच्या परवानगीची चिठ्ठी आणलीस का ?"

" छे, छे ! माझे वडील तर मला इंग्रजी शिकायला कधीच परवानगी देणार नाहीत. पण तरीही मला शिकायचंय, तुम्ही शिकवाल ना ?"

गुरुजींनी छोट्या वासुदेवाच्या डोळ्यांतील चमक पाहिली आणि त्याला इंग्रजी शिकवण्याचे मान्य केले. लहानपणीच हा जो इंग्रजीचा पाया पक्का झाला, त्याचा उपयोग वासुदेव बळवंतांना मोठेपणी इंग्रजांविरुद्ध लढताना झाला.

कल्याणला प्राथमिक शिक्षण झाल्यावर, काही दिवस पुढच्या शिक्षणासाठी वासुदेव मुंबईला राहिला. पण तिथली शाळा त्याला मनापासून आवडली नाही. म्हणून त्याला पुढच्या शिक्षणासाठी पुण्यात ठेवण्यात आले. पुण्यातील विश्रामबागवाड्यात ' पूना हायस्कूल ' मध्ये तो शिकू लागला. या शाळेत तो दोन वर्षे शिकला. त्या काळात प्रमाण-ग्रंथ मानलेली हॉवर्ड-मालिकेतील दोन पुस्तके त्याने पूर्ण केली. फायनल परीक्षेपर्यंतचा अभ्यास त्याने पूर्ण केला. पण या परीक्षेच्या बळावर पुढे चांगल्या पगाराची नोकरी मिळवायची, ही आकांक्षा त्याच्या मनात कधीच नव्हती. त्यामुळे फायनलपर्यंतचा अभ्यास करूनही तो परीक्षेला बसलाच नाही.

पुण्यात आल्यावर वासुदेवाने आणखी एक गोष्ट केली. सुरुवातीपासूनच त्याचे सुदृढ शरीर. त्यात आता त्याला तालीमबाजीचा शौक जडला. लहूजीबाबांच्या आखाड्यात तो जाई. महात्मा ज्योतिराव फुले सुद्धा तरुण वयात लहूजीबाबांकडे जात. या गुरुजींकडून त्यांनी केवळ मल्लविद्याच नव्हे, तर इतरही अनेक प्रकारची मर्दानी कौशल्ये शिकून घेतली. वासुदेवाच्या बंडखोरपणाला इथे पुरेपूर वाव मिळाला. तरुण वयात त्याने व्यायाम करून शरीर कमावले. आयुष्यात पुढे त्याच्याहातून जे क्रांतिकार्य झाले, त्याची पायाभरणीच लहूजीबाबांच्या तालमीत तरुण वयात झाली.

मुंज झाली, तरी वासुदेवाचा हूडपणा काही कमी झाला नाही. त्याने नोकरी करावी म्हणून बळवंतरावांनी खूप खटपट केली. पण त्याच्या स्वतंत्र वृत्तीला

नोकरीपेशा मानवणारा नव्हता. नोकरीत त्यांचे वरिष्ठांशी किंवा बरोबरच्या सहकाऱ्यांशी पटणे कठीण. मग वडिलांनी वासुदेवाच्या लग्नाची घाई सुरू केली. पण कितीही मुली दाखविल्या तरी वासुदेवाला एकही मुलगी पसंत पडेना. पत्नी कशी असावी या संबंधी त्याच्या मनात काही आडाखे असणार. ' माझी सहधर्मचारिणी होण्याचे गुण एकाही मुलीत आढळले नाहीत ' असे ते म्हणत. अखेरीस शिरढोण जवळच्याच पालेगावमधील दाजिबा सोमणांची मुलगी पसंत पडली. विवाहसमयी वासुदेवाचे वय पंधरा वर्षांचे होते. प्रपंच चालविण्यासाठी द्रव्य हवे म्हणून वासुदेवाने कारकुनाची नोकरी धरली. आणि ते वासुदेवाचे वासुदेव बळवंत झाले. संसारात रमले. पहिल्या पत्नीपासून त्यांना मधू नावाची मुलगी झाली. पण अल्पशा आजाराचे निमित्त होऊन पत्नीला मृत्यू आला. मुलगी लहान, तिचे करणार कोण ? म्हणून त्यांनी दुसरे लग्न केले. त्यांच्या दुसऱ्या पत्नी म्हणजे गोपिकाबाई. संसार तर मागे लागला, पण वासुदेव बळवंताच्या आयुष्याची दिशा अजून ठरायची होती. त्याच्या बंडखोर स्वभावाला, चाकोरीबद्ध जीवन मानवणारे नव्हते. मुंबईत थोडे दिवस राहून त्यांनी पुण्यात बिऱ्हाड केले. या पुण्यानेच त्याच्या आयुष्याला योग्य ती दिशा दिली.

***

# त्या काळातील पुणे

वासुदेव बळवंतांनी सुरुवातीची काही वर्षे मुंबईत लेखनिक म्हणून काम केले. मुंबईची हवा त्यांना मानवली नाही. १८६५ मध्ये त्यांना कसलातरी विचित्र ज्वर आला. या ज्वराने ते तासन् तास बेशुद्ध होऊन पडायचे. दोन तीन महिने त्यांनी अंथरुणाला खिळलेल्या अवस्थेत काढले. काही दिवस सुट्टी घेऊन ते वाई, सातारा, पंढरपूर अशा ठिकाणी जाऊन राहिले. प्रकृती थोडी सुधारली. पण नोकरी-पेशात त्यांचा जीव रमेना. वरिष्ठांशी पटले नाही. अपमान झाला की, एक नोकरी सोडायची, दुसरी धरायची, असा प्रकार सुरू झाला. रेल्वेतील ऑडिट-ऑफिसमध्ये दरमहा वीस रुपये वेतनावर पहिली नोकरी होती. चारच महिने नोकरी केली. तिथल्या हेडक्लार्कशी खटका उडाला आणि नोकरी सोडून दिली. ठाकुरद्वारा येथील ग्रँड मेडिकल कॉलेजमधे ३० रु. पगारावर लेखनिक म्हणून काम केले. दोन वर्षे नोकरी केली,पाण प्रकृतीच्या कारणावरून ते बराच काळ रजेवरच होते. पुढे त्यांना मिलिटरी अकाउंट्सच्या कार्यालयात नोकरी मिळाली आणि लवकरच त्यांची पुण्यात बदली झाली. त्या वेळी वासुदेव बळवंतांना कल्पनाही नसेल की, हे पुणेच त्यांच्या जीवनाला नवी दिशा देणार आहे.

पुण्यात आल्यावर त्यांनी पहिल्यांदा भिकारदास मारुती जवळील भट गुरुजींच्या वाड्यात बिऱ्हाड थाटले. नंतर सध्या पुणे विद्यार्थी गृह जेथे आहे, त्याच्या समोरच्या नरसोबाच्या देवळात त्यांचे बिऱ्हाड बरीच वर्षे होते. हा भाग त्या वेळी गावाच्या एका टोकाला होता. आसपास मनुष्यवस्ती फारशी नव्हती. त्यामुळे त्यांच्या क्रांतिकारक हालचालींना हे सारे वातावरण पूरकच होते. त्या

वेळचे पुणे कसे होते, ह्याची आजच्या काळातले पुणे ज्यांनी पाहिले आहे, त्यांना चटकन् कल्पनाही करता येणार नाही. पुण्याचा पश्चिम भाग जो आज गजबजलेला, मध्यवस्तीचा परिसर आहे ( जिमखाना ), तो त्या वेळी अस्तित्वातच नव्हता. पुणे विद्यार्थी गृहापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंतचा भाग हा गर्द रानाने व्यापला होता. गावात अद्ययावत् अशी घरे तर नव्हतीच, होते ते मोठमोठाले प्रशस्त वाडे. बहुतेक वाड्यांच्या बाहेरच्या बाजूला गाई-गुरांचे गोठे असत. विजेचा झगमगाट नव्हता. सगळीकडे अंधुक प्रकाश देणारे तेलाचे दिवे. टेबल-खुर्चीऐवजी बैठकीच्या खोलीत गाद्या-तक्क्यांची बैठक असे. नळ फक्त श्रीमंतांकडे. बाकी बहुतेक वाड्यांतून विहिरी असत. पुण्यात राजमार्ग आणि डांबरी रस्ते नव्हतेच. त्या वेळी रस्त्यावरून दुचाक्याही (सायकली ) फारशा दिसायच्या नाहीत. जास्त वापर होता तो बैलगाड्यांचा आणि श्रीमंतांसाठी घोड्याचे टांगे किंवा बग्गी, पालख्या, मेणे असाही प्रकार होता. त्या वेळच्या पोषाखात गाजलेल्या दोन वस्तू म्हणजे पुणेरी पगडी आणि पुणेरी जोडा. मुलांच्या अंगात आणि मोठ्या पुरुषांच्या अंगात अंगरखे किंवा बाराबंद्या, धोतर आणि जाकीट आणि स्त्रियांचा सरसकट पोषाख नऊवारी लुगडे आणि चोळी. मनगटी घड्याळे फक्त श्रीमंतांकडेच. वेळ समजण्यासाठी पोलीस-चौक्यांवर दोन कप्प्यांची वाळूची घड्याळे असत. तासांचे टोले ऐकून लोकांना किती वाजले ते समजायचे.

पुण्यात त्या काळी शाळा किती थोड्या होत्या. इंग्रजी शिकण्यासाठी बाबा गोखल्यांची शाळा, महात्मा फुल्यांची मुलींसाठी आणि अस्पृश्यांसाठी काढलेली शाळा. नंतरच्या काळात पूना हायस्कूल ही सरकारी शाळा सुरू झाली. पण या शाळेतून इंग्रजी राजवटीशी एकनिष्ठ रहाण्याचे धडे शिकवले जात. मिशनऱ्यांच्या शाळेमधून तर शिवाजी हा लुटारू होता, गाईला आत्मा नसतो असली शिकवण दिली जाई. सरकारला राज्यकारभार चालवण्यासाठी कारकून-मंडळी हवी होती. त्यामुळे बहुतेक सर्व शिक्षण त्या धर्तीचे होते. इंग्रजांनी त्यांच्या राज्यकारभारासाठी रेल्वे, तारखाते यांसारख्या ज्या काही सुधारणा केल्या, त्यामुळे इथले लोक दिपून गेले होते. इंग्रजांविरुद्ध बंड करण्याची भाषा तर राहोच, पण. परमेश्वरानेच आम्हाला सुधारण्यासाठी हा

देवदूत पाठवला आहे, अशा भ्रमात आमचे लोक होते. थोडेफार इंग्रजी शिक्षण घेणारे तरुण पाश्चात्यांचे स्तुतिपाठक बनू लागले होते.

पुण्यातल्या या साऱ्या वातावरणाचे वासुदेव बळवंतांच्या मनावर साद-पडसाद उमटत होते. वडिलांकडून त्यांनी १८५७ च्या बंडातील क्रांतिकारकांच्या हकीकती ऐकल्या होत्या. तेव्हापासून त्यांच्या मनात परकीय राज्यकर्त्यांबद्दल चीड होतीच. इथे तर पुण्यातल्या वातावरणात बंडखोरीचा कुठे मागमूसही नव्हता. पण त्यांना मुंबईपेक्षा पुणे अधिक आवडले. वासुदेव बळवंत सुरुवातीपासून दत्तात्रेयांचे भक्त. आणि निवृत्तिमार्गीच होते. त्यांचा बराचसा वेळ दत्तात्रेयांच्या उपासनेत जाई. नरसोबाच्या देवळात ते तासन्-तास ध्यान-धारणेत वेळ घालवत. इंग्रजांबद्दल राग तर होताच, पण इंग्रजांविरुद्ध काय करावे, याबद्दलचे त्यांचे सुरुवातीचे विचार आतताई होते. आणि आजच्या काळात ते विचित्रच वाटतील. हिमालयात जावे, तपश्चर्या करावी, काही तरी योगिक सिद्धी प्राप्त करून घ्यावी आणि इंग्रजांचे भस्म करून टाकावे, असे अनेक वेळा त्यांच्या मनात येई. या मार्गानेच जर ते पुढे गेले असते, तर ते कुणीतरी वासुदेवानंद स्वामी किंवा साधू झाले असते. पण नियतीची इच्छा निराळीच होती. पुण्यातील वास्तव्यात त्यांच्या जीवनात असा एक प्रसंग घडला की, ज्यामुळे त्यांच्या संपूर्ण जीवनालाच कलाटणी मिळाली.

***

# ‘ मातृवियोग ’

‘ अजून कसा वासू आला नाही ? मला एकदा त्याला शेवटचं भेटायचं आहे.’ मृत्युशय्येवर आयुष्याच्या घटका मोजणाऱ्या सरस्वतीबाईंना हा एकच ध्यास लागून राहिला होता. बळवंतराव तिची समजूत घालत होते. “ अगं, येईल तो, गाडी नसेल मिळाली त्याला वेळेवर, कदाचित् तिथून त्याला निघायला उशीर झाला असेल. त्याला आपला निरोप तरी वेळेवर मिळाला की नाही, कुणास ठाऊक ?”

इकडे वासुदेव बळवंत त्या वेळी पुण्यात नोकरी करत होते. ‘ आई अत्यवस्थ आहे. ताबडतोब निघून ये.’ असं पत्र मिळालं. त्यालाही दोन दिवस होऊन गेले. आईच्या भेटीची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती. वरिष्ठ तर रजा देत नव्हते. काय करावे ? या विवंचनेत दोन दिवस गेले. मनात भयंकर संघर्ष सुरू झाला. रजा मंजूर झाली नाही, तरी आँईला भेटायचे का ? काय होईल ? फार तर नोकरीवरून कमी करतील. एक नोकरी गेली तर दुसरी मिळेल. पण आज जर आई भेटली नाही, तर पुन्हा आईची भेट होणारही नाही. मनाचा निश्चय झाला, काय वाटेल ते होवो, आईला भेटायला जायचेच. रजेचा अर्ज देऊन साहेबाच्या मंजुरीची वाट न पहाता, सरळ त्यांनी स्टेशन गाठले. शिरढोणपर्यंत थेट गाडी नाही. गाडीने ते कर्जतपर्यंत आले. कर्जतला उतरून डोंगरदऱ्या पार करत मोठ्या उत्कंठेने ते शिरढोणपर्यंत पायी आले. मनात शंकाकुशंकांचे काहूर माजले. अगदी अधीरतेने वासुदेव बळवंतांनी घरात पाऊल ठेवले. घरातले वातावरण सुन्न होते. ओसरीवर ठेवलेला दिवा काही न बोलताच सर्व काही सांगून गेला.

वासुदेव बळवंतांना भडभडून आले. एवढा जिवाचा आटापिटा आईच्या भेटीसाठी केला, पण आईची अखेरची भेट नाही होऊ शकली बळवंतराव सांगत होते.

" वासुदेवा, सारखा तुझ्या नावाचा जप चालला होता. डोळयांत प्राण आणून तुझी वाट पहात होती. पण परमेश्वराची इच्छा. भेटीचा योग नव्हता हेच खरं." इतका वेळ थोपवून धरलेला अश्रूंचा बांध फुटला. आल्या-गेल्यांनी सांत्वन केले, तरीही त्यांचे मन शांत होईना. मनामध्ये प्रचंड प्रक्षोभ दाटून राहिला होता. तो युरोपियन दुष्ट साहेब, त्याच्या निर्दयी वृत्तीमुळे माझी आणि आईची ताटातूट झाली. त्याने रजा नाकारली आणि माझी आई मला अंतरली. हे नुकसान कसे भरून येणार ? या साऱ्याला जबाबदार कोण ? हे प्रश्न मनाला सतत छळत होते. ऑफिसमधे आल्यावर वासुदेव बळवंतांनी साहेबाची कडक शब्दांत कानउघाडणी केली. पण साहेबाने त्यावर कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त



आईचे वर्षश्राध्द आले, पण त्या दिवसासही रजा नाकारण्यात आली.

केली नाही. वासुदेव बळवंतांनी वरच्या अधिकाऱ्यांकडे या साहेबाविरुद्ध लेखी तक्रार केली. त्या अधिकाऱ्याला खरे तर वासुदेव बळवंतांचे म्हणणे पटले होते. त्याने साहेबाची कानउघडणी केली. पण या पलीकडे काहीच झाले नाही. तो युरोपियन साहेब अधिकच छळू लागला. पुढे आईचे वर्षश्राद्ध आले. पण त्या दिवसासाठीही रजा नाकरण्यात आली. वासुदेव बळवंतांच्या मनात विचार आला, ' आपल्या हातून आईची सेवा होत नसेल तर करायची काय ती नोकरी ?' नोकरी लगेच सोडण्यासारखी परिस्थिती नव्हती. पण मनाची स्वस्थता हरवली, आणि मग विचारांती मनाचा निर्धार झाला, ' बस, आयुष्याचं ध्येय ठरलं. इंग्रज साहेबामुळे माझी व माझ्या आईची ताटातूट झाली. या इंग्रज राज्यकर्त्यांना देशाबाहेर घालवणे हेच या पुढे माझे काम.'

***

# सनदशीर मार्गाने काय साधणार ?

मातृवियोग हे वासुदेव बळवंतांच्या मनात इंग्रज राज्यकर्त्यांबद्दलच्या असंतोषाचे निमित्त होते. पण त्याशिवाय इंग्रजी राज्य उलथून पाडले पाहिजे, असे विचार त्यांच्या मनात दृढ व्हायला आणखीही काही घटना घडत गेल्या.

१८७० मध्ये पुण्यात लकडीपुलाजवळ, पंतांच्या गोटात, ' सार्वजनिक सभा ' ही संस्था स्थापन झाली. पर्वती संस्थानच्या कारभारातील गोंधळ दूर करणे, या कारणासाठी स्थापन झालेली ही संस्था. नंतरच्या काळात लोकमत प्रगट करणारी प्रबळ संस्था म्हणून नावारूपास आली. सार्वजनिक कार्य कसे करावे, याचा आदर्शच या संस्थेने घालून दिला. या संस्थेच्या कार्याचे प्रमुख सूत्रधार होते गणेश वासुदेव जोशी. ते या सभेच्या सार्वजनिक कार्याशी इतके एकरूप झाले होते की, लोक त्यांचे मूळ नाव विसरले. आणि त्यांना सार्वजनिक काका म्हणूनच ओळखू लागले. पुढे १८७१ मध्ये न्यायमूर्ती माधवराव रानडे या संस्थेला येऊन मिळाले, आणि संस्थेच्या कामाचा व्याप वाढत चालला. १८७२ मध्ये न्या. रानडे यांचे सार्वजनिक सभेत ' स्वदेशी व्यापार ' या विषयावर व्याख्यान झाले, त्याचा वासुदेव बळवंतांवर विशेष परिणाम झाला. त्या क्षणापासून त्यांनी स्वदेशीचे व्रत घेतले. एक दिवस त्यांच्या ऑफिसमधील टेबलावर कोणीतरी युरोपियन लेखणी आणून ठेवली. ती त्यांनी रागारागाने मोडून टाकली. स्वत:चा त्यांचा पोषाख तर स्वदेशी होताच. वासुदेव बळवंत सार्वजनिक सभेच्या कामात हळूहळू सहभागी होऊ लागले.

पुण्यातील काही तरुणांनी एकत्र येऊन ' ऐक्यवर्धिनी ' नावाची संस्था स्थापन केली. वासुदेव बळवंत या संस्थेचे सुरुवातीपासूनचे सभासद होते.

लोकांना परकीय राज्यकर्त्यांच्या अन्यायाविरुद्ध जागे करायचे असेल, तर त्या साठी स्वदेशप्रेम निर्माण करणारेच शिक्षण हवे. त्या वेळच्या सरकारी शाळा नुसत्या पुस्तकी शिक्षण देत, स्वदेशप्रेम हा भाग तर त्यात औषधाला सुद्धा नव्हता. मुलांना राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षण देता यावे या साठी, १८७४ मध्ये, पुण्यामध्ये ' पूना नेटिव्ह इन्स्टिट्यूशन ' ही पहिली बिनसरकारी शिक्षणसंस्था निघाली. वासुदेव बळवंत या संस्थेचे पहिले कार्यवाह व कोषाध्यक्ष होते, पुण्यातील जुन्या तपकीरगल्लीत ही शाळा सुरू झाली. पुढे वामनराव भावे या संस्थेला येऊन मिळाले. ते वृत्तीने अत्यंत मवाळ होते. इंग्रज सरकारशी कठोरता ही त्यांच्या वृत्तीतच नव्हती. त्यामुळे वासुदेव बळवंतांचा, देशभक्तीचे शिक्षण देण्याचा मूळ हेतूच बाजूला पडल्यासारखा झाला. या शाळेशी पुढे वासुदेव बळवंतांचा फारसा संबंधही आला नाही. नंतरच्या काळात हीच शाळा भावे यांच्या नावाने जास्त ओळखली जाऊ लागली. आजची भावेस्कूल ही शाळा मूळातील याच संस्थेची. वासुदेव बळवंतांनी स्वदेशप्रेमाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला होता, हे या घटनेवरून दिसून येते.

इंग्रजी राजवटीविरुद्ध जनमत जागे करण्यासाठी, वासुदेव बळवंतांनी व्याख्याने देण्याचाही धडाका लावला. पुण्याबरोबरच पनवेल, पळस्पे, तासगाव, नरसोबाची वाडी अशा दूरदूरच्या ठिकाणी ते शनिवार, रविवार व इतर सुट्टीच्या दिवशी व्याख्यानासाठी जात. हातामध्ये थाळी घेऊन ते व्याख्यानाची दवंडी चौकाचौकात उभे राहून स्वतःच देत. पुण्यातील शनिवार वाड्याने वासुदेव बळवंतांची अनेक व्याख्याने ऐकली. त्यांची व्याख्याने ऐकून तरुणांच्याच काय, पण वृद्धांच्याही अंगात स्फुरण चढे. अंगावर रोमांच उभे रहात. आपण आता देशाच्या स्वातंत्र्यासाठी काहीतरी केले पाहिजे, असा विचार त्यांच्या मनांत निर्माण होई. स्वराज्य मिळाल्याशिवाय आपली दुःखे दूर होणार नाहीत, हाच मंत्र त्यांच्या प्रत्येक व्याख्यानात असे. व्याख्यानाने लोक प्रभावित होत. पण तुमच्या पावलावर पाऊल टाकून आम्हीपण लढ्यात उतरतो, असे सांगणारे फारच थोडे भेटत. आपण इतके जिवापाड प्रयत्न करत आहोत, पण लोकांची पुरेशी साथ मिळत नाही याबद्दल ते अनेक वेळा निराश होत.

तरुणांना जमा करून ते अनेक वेळा प्रभातफेऱ्या काढत. त्यातून समर्थांच्या मनाच्या श्लोकांच्या बरोबरच देशभक्तीच्या घोषणा आणि गाणीही असत. अशा या प्रयत्नांतून त्यांच्या विचाराला साथ देणारी काही तरुण माणसे संघटित होऊ लागली.

१८७६ आणि ७७ अशी दोन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळाने हाहा:कार माजवला. वरुणराजाची अवकृपा ! पण इंग्रज सरकार लोकांची हीन-दीन अवस्था मूकपणे पहात राहिले. तलाव, विहिरी, नाले, नद्या सारे काही सुकून गेले. प्यायला पाणी नाही, खायला अन्न नाही. घालायला अंगभर कपडा नाही, असले विचित्र दिवस आले. वासुदेव बळवंतांचे सहृदय अंत:करण हेलावले. त्यांनी भगवी वस्त्रे धारण करून खेडोपाडी पायी प्रवास करून दुष्काळी परिस्थितीची पहाणी केली. फार भीषण चित्र त्यांना दिसले. ज्यांना पोटच्या पोरांप्रमाणे जपले अशी गुरेढोरे खाटीक-खान्याची वाट चालू लागली. स्वत:लाही खायला नाही, तर गुराढोरांना काय देणार? शेतकरी नाइलाजाने जनावरांच्या गळ्यात चिठ्ठ्या अडकवत. ' तुमचा आमचा ऋणानुबंध संपला, वाट फुटेल तिकडे जा. पण आमच्या डोळ्यासमोर तडफडून मरू नका.' कित्येकांनी स्वत:च्या बायका-मुलांसह आत्महत्या केली. गावेच्या गावे ओस पडू लागली. वासुदेव बळवंतांना हे सारे मूकपणे साहवेना. त्यांनी स्वत:च्या बायकोचे दागिने विकून लोकांना मदत केली. पण जिथे आभाळच फाटले होते, तिथे ठिगळ कुठे कुठे लावणार ? सरकारने दुष्काळ-निवारणाचे उपाय योजले. दुष्काळी कामे काढली. पण मजुरी किती ? अर्धा शेर धान्य, आणि दीड आणा. उपासमारीमुळे लोकांत श्रम करण्याचे त्राणच उरले नव्हते. देशात अशी भयानक परिस्थिती, तर तिकडे दिल्लीमधे राणी व्हिक्टोरियाचा हिंदुस्थानची सम्राज्ञी म्हणून थाटामाटात सन्मान आणि पैशाची वारेमाप उधळपट्टी !

हे सारे पाहिल्यानंतर वासुदेव बळवंतांच्या लक्षात आले, यापुढे सनदशीर मार्गाने यश मिळण्याची सुतराम शक्यता नाही, आता सशस्त्र उठावच करायला हवा.

***

# घे शस्त्र आणि हो पुढे !

सशस्त्र क्रांतीच्या वेडाने वासुदेव बळवंतांना इतके झपाटले की, रात्रंदिवस त्यांच्या डोक्यात या विचाराचे थैमान. जिवाला स्वस्थता म्हणून नाही. रात्री अपरात्री केव्हा तरी झोपेतून उठायचे आणि " मला इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंड करायचे आहे. त्यांना या देशातून हाकलून द्यायचे आहे," असे काहीतरी बडबडायचे. त्यांच्या तोंडून सशस्त्र क्रांतीची भाषा ऐकल्यावर अनेकांनी त्यांना वेड्यांत काढले. " अहो काय सांगता ? इंग्रजांविरुद्ध शस्त्र घेऊन लढायचे ? त्यांच्या पुढे आपला काय निभाव लागणार ? हा निव्वळ उतावळेपणा आहे." " यातून फक्त स्वतःचा नाश होईल." " थोडा धीर धरायला हवा." पण बंड करण्यासाठी वासुदेव बळवंत अगदी अधीर झाले होते. कोणी त्यांना सबुरीचा सल्ला द्यायला लागला की, ते त्याला सांगत, " मी काय सोसले याची तुम्हाला काय कल्पना ? माझ्या सारखी वेळ तुमच्यावर आली असती, तर तुम्ही सुद्धा असेच बंडखोर झाला असता. धीर धरा, वाट पहा, पण किती दिवस ? आता अगदी गळ्याशी आलंय. सनदशीर मार्गांनी मीही प्रयत्न केला. पण त्याचा काही उपयोग होत नाही, हे मला कळून चुकलंय. आता यापुढे जो भेटेल त्याला मी सांगत सुटणार, ' घे शस्त्र आणि हो पुढे. ' नुसती ठिणगी पडली तरी त्यात इंग्रजी राज्य भस्मसात् होऊन जाईल. "

स्वतः वासुदेव बळवंत अनेक प्रकारच्या अस्त्र आणि शस्त्र-विद्येत प्रवीण होते. तरुण वयात लहूजीबाबांच्या आखाड्यात हे धडे मिळाले होते. पण शस्त्रास्त्रांचे शिक्षण देणार कोणाला ? व्याख्यानाला सुशिक्षित वर्ग गर्दी

करायचा. भाषणाने प्रभावित व्हायचा, पण त्यांचा उत्साह तेवढाच. क्रांतीची भाषा निघाली, हातात शस्त्रे घ्यायचा प्रसंग आला, की त्यांचे पाय लटपटायचे. मग वासुदेव बळवंतांनी खेडोपाडी जाऊन, रामोशी, आदिवासी, कोळी यांना गोळा केले. विशेषत: रामोशांनी वासुदेव बळवंतांना चांगली साथ दिली. हे रामोशी इंग्रजांच्या विरुद्ध मनांत राग धरून होते. त्याला कारणही तसेच होते. रामोशी स्वत:ला रामवंशी म्हणवून घेत. शरीराने कणखर असणारे रामोशी शिवकाळात आणि नंतर पेशवेकाळातही गड-किल्ल्यांवर किल्लेदार म्हणून मानाने मिरवले, पण आता इंग्रज सरकार आले, रामोशी देशोधडीला लागले. कुठेतरी जंगलात राहून, लाकडे तोडून त्यावर गुजराण करण्याची वेळ त्यांच्यावर आली. पण पुढे जंगलाचा कायदा आला आणि त्यांचे हेही उत्पन्नाचे साधन बुडाले. असंतोषाने धुमसणाऱ्या या रामोशांत वासुदेव बळवंत एखाद्या वावटळीप्रमाणे शिरले. त्यांनी रामोशांची मने जिंकली. " आम्हाला तुम्ही फक्त शस्त्र द्या. आम्ही इंग्रजांविरुद्ध बंड उभारू." असे ज्या वेळी रामोशी प्रतिज्ञापूर्वक सांगत, त्या वेळी




वासुदेव बळवंतांनी रामोशी, आदिवासी, कोळी यांना गोळा केले.

वासुदेव बळवंतांना वाटे, आता विजय फार दूर नाही. लोकांना ते सांगत, " मी बोललो ते तुम्हाला अशक्य वाटते काय ? मग मी तुम्हाला आता प्रत्यक्ष करूनच दाखवतो."

शस्त्रास्त्रांचे शिक्षण दिवसाढवळ्या उघडपणे देणे तर शक्यच नव्हते, रात्रीच्या वेळात कधी पर्वतीच्या मागे, तर कधी गुलटेकडीच्या परिसरात वासुदेव बळवंत सहकाऱ्यांना जमवत आणि त्यांना निरनिराळ्या प्रकारची प्रात्यक्षिके करून दाखवत. मल्ल-विद्येपासून ते तलवारबाजी, नेमबाजी, गोळीबार, भालाफेक, घोड्यावरून रपेट, पुरातून पोहून जाणे अशी अनेक कौशल्ये त्यांत असत. दोन्ही बाजूला सशस्त्र सहकाऱ्यांचा गराडा असताना, त्यांचा मारा चुकवत घोड्यावरून कसे निसटून जाता येईल, तोंडात शस्त्र धरून फक्त पाटीच्या सहाय्याने डोंगराचा कडा कसा चढून जाता येईल, हे सर्व वासुदेव बळवंत स्वत: करत. दसऱ्याच्या दिवशी रास्तेवाड्यात सर्व सहकारी एकत्र जमत. शस्त्रास्त्रांची पूजा होई. वासुदेव बळवंत प्रत्येकाच्या हातात दही-पोह्याचा द्रोण देऊन शपथ घ्यायला सांगत.

" हं म्हणा, या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र लढा उभारून प्राणांचेही मोल द्यायला मागे पुढे पहाणार नाही." मनाच्या भारावलेल्या अवस्थेत सर्वजण अशा प्रकारची शपथ घेत.

त्या काळात वासुदेव बळवंतांना रामोशी, आदिवासी, कोळी अशा अशिक्षित समाजातून अनेक सहकारी तर लाभलेच, पण त्याचबरोबर पुण्यातील खुन्या मुरलीधराच्या देवळाचे मालक विष्णू बळवंत आणि मोरो बळवंत खरे, सीतारामपंत गोडबोले, माधवराव नामजोशी, अण्णासाहेब पटवर्धन, गणपतराव घोटवडेकर, अप्पा वैद्य, भिकाजीपंत हर्डीकर असे काही ब्राह्मण सहकारीही मिळाले. पण या सर्वांपेक्षा दोन शिष्यांचा विशेष उल्लेख करायला हवा. त्यांपैकीच एक म्हणजे वासुदेव बळवंतांच्या पत्नी गोपिकाबाई ऊर्फ बाई फडके. वासुदेव बळवंतांचे स्त्रियांच्या बाबतचे विचार पुरोगामी होते. स्वत:च्या पत्नीला त्यांनी नुसते संस्कृत शिकवले नाही, तर शस्त्रास्त्रांचेही हात शिकवले, त्या दांडपट्टा चालवण्यात निष्णात होत्या, असा उल्लेख आहे.

वासुदेव बळवंतांचे दुसरे नाणावलेले शिष्य म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. त्या काळी ते कॉलेज शिकणारे तरुण विद्यार्थी होते. शरीर-साधनेचे वेड घेऊन ते या चळवळीत सामील झाले. पण कोणतीही गोष्ट उतावळेपणाने करणे, हे त्यांच्या स्वभावात नव्हते. याच कारणावरून त्यांचा वासुदेव बळवंतांशी खटका उडाला. त्याचे असे झाले, शस्त्रपूजनाचे वेळी इतर अनेकांप्रमाणे वासुदेव बळवंतांनी टिळकांना शपथ घ्यायला सांगितली. तेव्हा दोघांच्या विचारांतील फरक स्पष्ट झाला. " तुम्ही मला शपथ घ्यायला सांगता, मीही देशप्रेमाने भारलेला आहे. त्यामुळे तशीच वेळ आली तरी प्राणांचे मोल द्यायला मागे पुढे पहाणार नाही. पण मला असे वाटते की, इतके मोठे मोल देणार आहोत, तेव्हा ते विचारपूर्वकच व्हावे. "

" म्हणजे हा सारा खेळ आम्ही विचार न करता मांडला आहे असं का तुम्हाला म्हणायचं आहे ?"

" आता स्पष्ट विचारलंत तेंव्हा स्पष्टच सांगतो, पाच पन्नास तरुण माणसं एकत्र जमून शस्त्रास्त्रांचे हात करतात, म्हणून उगीच हुरळून जाण्यात काय अर्थ ? इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढा द्यायचा म्हणजे फार मोठी तयारी करायला हवी."

" कसली तयारी ?"

" स्वराज्य कसे मिळवायचे याचे मी गणित मांडतोय. सुरुवातीला आपल्या शत्रूचे बळ किती आहे आणि कशात आहे, याचा शोध घ्यायला हवा. इंग्रजांबरोबर लढण्यासाठी आधुनिक अस्त्रविद्या शिकून घ्यायला हवी. युद्धतंत्राचा अभ्यास करायला हवा. गुप्त हेरगिरी कशी करायची याचेही शिक्षण घ्यायला हवे. आणि मुख्य म्हणजे ज्यांच्या हातात आपण शस्त्र देणार आहोत, त्यांची मने देशाप्रेमाने भारून टाकायला हवीत. यासाठी स्वदेशीचे शिक्षण देणाऱ्या शाळा हव्यात."

" तुम्ही म्हणता ते खरं असलं, तरीही फार मोठ्या तयारीची आवश्यकता आहे, असं मला वाटत नाही. सगळीकडे नुसता इंग्रजी सत्तेविरुद्ध असंतोष

भरून राहिला आहे. नुसती ठिणगी पडायचा अवकाश. बंड झाल्याशिवाय रहाणार नाही."

" नुसत्या असंतोषातून लढा यशस्वी झाल्याची इतिहासाची साक्ष नाही."

" छे, छे ! तुम्ही कॉलेजचे तरुण शंका काढण्यात हुशार. तुमच्या शंकाकुशंकांत अडलो तर माझ्या हातून काहीच काम होणार नाही. मी या मार्गानेच जाणार. तुम्हाला पटत असेल तर माझ्याबरोबर येऊ शकता."

" असं असेल तर तुमचं आमचं जमणार नाही."

टिळक जितक्या झपाट्याने या चळवळीत सामील झाले तितक्याच झटक्याने ते त्यातून बाहेरही पडले. वासुदेव बळवंतांचा काहीसा उतावीळ स्वभाव त्यांना मानवला नाही. पण चळवळीतून बाहेर पडले तरीही वासुदेव बळवंतांतला एक गुण त्यांच्या अंगाला चिकटला, तो मात्र कायमचाच. तो गुण म्हणजे तळमळ.

सशस्त्र बंड उभारायचे म्हणजे त्यासाठी मोठ्या प्रमाणात शस्त्रे विकत घ्यायला हवीत. शस्त्रे घेण्यासाठी पैसा हवा. हा पैसा कसा उभा करणार ? द्रव्य उभारण्यासाठी त्यांनी अनेक श्रीमंत लोकांच्या भेटी घेतल्या. त्यांना हात जोडून विनवले. " मला हा पैसा स्वत:साठी नको. स्वराज्याच्या कामासाठी हवा. यातून आम्ही शस्त्रे खरेदी करणार. मी तुम्हाला वचनचिठ्ठी लिहून देतो की, स्वराज्य मिळाल्यावर तुमचे पैसे व्याजासकट परत करतो." पण अशा प्रकारे दिलेला पैसा परत मिळू शकेल, यावर धनिकांचा विश्वासच बसेना. ही कल्पना त्यांना अशक्य कोटीतील वाटत होती. त्यामुळे वासुदेव बळवंतांच्या या आवाहनाला, म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. वासुदेव बळवंतांनी स्वत:जवळ होता नव्हता तो पैसा, शस्त्रे खरेदीसाठी खर्च केला. पण एकटा माणूस कितीसा पुरे पडणार ? लोकांची तर बंडाची पुरेशी तयारी नाही, तयारी होईल म्हणून किती काळ वाट पहायची ? म्हणजे आमच्या डोक्यावर इंग्रजांचे राज्य कायमचे बसणार काय ? वासुदेव बळवंतांच्या मनात विचारांचे काहूर माजले. यातूनच त्यांनी एक

जालिम आणि कठोर उपाय शोधून काढला. लोक आपणहून पैसा द्यायला तयार नसतील तर चक्क दरोडे घालायचे. लुटालूट करायची, आणि पैसा उभा करायचा. त्यात त्यांना काहीही वावगे वाटले नाही. त्यांच्यासमोर शिवछत्रपतींचा आदर्श होता. सर्व बाजूंनी प्रतिकूल वातावरण असताना व पैसा मिळवण्यासाठी दुसरे कोणतेही साधन उपलब्ध नसताना, महाराजांना स्वराज्य चालवण्यासाठी पैसा हवा म्हणून, सुरतेचा खजिना लुटावा लागला. कल्याणचा खजिना लुटावा लागला. या साऱ्यामागचा हेतू अगदी शुद्ध होता. त्यात कोणताही स्वार्थ नव्हता.

वासुदेव बळवंत देवभक्त व श्रद्धाळू होते. काही सत्पुरुषांचा व साधूंचा त्यांना सहवास लाभला होता. आपण एका मोठ्या कामाला सुरुवात करणार आहोत, त्याला संतांचे आशीर्वाद हवेत, या कल्पनेने ते एक दिवस अक्कलकोटच्या स्वामी महाराजांच्या भेटीसाठी गेले. त्यांच्या चरणापाशी तलवार ठेवली आणि समोर हात जोडून बसून राहिले. अपेक्षा अशी की, स्वामी महाराजांनी स्पर्श करून ही तलवार परत करावी आणि चळवळीला आशीर्वाद द्यावेत. पण प्रत्यक्षात निराळेच घडले. स्वामींनी एका सेवकाला बोलावून ती तलवार झाडावर टांगून ठेव म्हणून सांगितले. वासुदेव बळवंतांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. हा अपशकून तर नव्हे ? या चळवळीला स्वामींचे आशीर्वाद नाहीत का ? स्वामींना कदाचित् असे तर सुचवायचे नाही, की सशस्त्र क्रांतीसाठी ही वेळ योग्य नाही ? पण हे विचार त्यांनी क्षणार्धात झटकून टाकले. त्यांना वाटू लागले की, असल्या शुभअशुभाच्या फेऱ्यात सापडलो तर आपल्या हातून काहीच काम होणार नाही. आता थांबायला वेळ नाही. ' घे शस्त्र आणि हो पुढे ' असे म्हणण्याची वेळ आली आहे, असा त्यांचा पक्का निर्धार झाला.

इतक्या मोठ्या प्रमाणात चळवळ उभारायची म्हणजे घरात रहाणे धोक्याचे होते. मोहिमेवर निघण्याच्या आदल्या रात्री वासुदेव बळवंतांनी आपल्या पत्नीला भावाकडे पोहोचवले. पत्नीचा निरोप घेताना तिच्या डोळ्यांतले अश्रू पाहून त्यांनी तिला धीर दिला.

" घाबरून जाऊ नकोस, काळजी करू नकोस, मी काही तुला कायमचा सोडून जात नाही. माझी मोहीम यशस्वी होणार. लवकरच आपला देश स्वतंत्र होणार. आपली भेट नक्की होणार."

गोपिकाबाई मोठ्या धीराच्या. डोळ्यांतील आसवे पुसून त्यांनी मोठ्या मनाने पतीला निरोप दिला. जाताना एकच सांगितलं,

" तुमची मोहीम यशस्वी होणार याची मला खात्री आहे. पण दुर्दैवाने उद्या कदाचित् तुमच्याबद्दल माझ्या कानावर काही बरंवाईट आलं तर तुमच्या मागे मी क्षणभर सुध्दा  जिवंत रहाणार नाही."

गोपिकाबाईंना त्या वेळी कदाचित् कल्पनाही नसेल, की ही अखेरचीच भेट आहे.

***

दिनांक
विषय

# वासुदेव बळवंत नावाचे वादळ

१८७९ हे वर्ष उजाडले. सशस्त्र उठाव कव्हा करायचा याचा मुहूर्त निश्चित झाला. वासुदेव बळवंतांनी पत्नीचा निरोप घेतला.

२० फेब्रुवारी १८७९. रात्रीची वेळ. वासुदेव बळवंतांचे सर्व सहकारी एकत्र जमले. सर्वांना त्यांनी गोडाचे जेवण दिले. रात्रीच्या बैठकीत त्यांनी सशस्त्र बंडाची योजना मांडली. " आम्हाला शस्त्र व पैसा द्या. आम्ही इंग्रजांविरुद्ध बंड उभारू " असे सर्व सहकाऱ्यांनी एका आवाजात सांगितले. बैलगाडीमध्ये सर्व शस्त्रात्रे भरण्यात येऊन, वर कडबा टाकण्यात आला. वासुदेव बळवंत त्यांची तलवार घेऊन सज्ज झाले. देवाला मनोभावे नमस्कार केला. आणि बिऱ्हाडाला कुलूप लावले. पुण्यावरून गाडी निघाली लोणीकंदकडे. लोणीजवळील जंगलात वासुदेव बळवंत आणि त्यांचे सहकारी अंधार पडेपर्यंत लपून राहिले. इशारा करताच लोक धामारी गावाच्या रोखाने निघाले. प्रत्येकाच्या हातात तलवारी, काठ्या, गोफणी, दांडपट्टा या सारखे काही ना काही तरी शस्त्र होतेच. धामारी गावचे लोक दिवसभराचे काम आटोपून सायंकाळी परतले. तो त्यांना एकाएकी रणशिंगांचा आवाज ऐकू आला. त्या पाठोपाठ बंदुकीचेही आवाज ऐकू आले. गावात सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले. पहारा करणाऱ्या रामोश्याला पकडण्यात आले. त्याच्याकडून गावातील सावकारांची माहिती मिळवण्यात आली. त्यांची घरे दाखवून पहारेकरी जीव मुठीत धरून पळत सुटला. लोकांनी भीतीने घरांचे दरवाजे लावून घेतले. गावातील सावकार गाव सोडून पळून गेले. सुरुवातीला गावातील किलाचंद मारवाड्याचे घर लुटण्यात आले. इतर सावकारांच्या घरांचीही लूट झाली. त्यांना अडवणारे तिथे कोणीच नव्हते. धामारीच्या मुख्य

चौकात जमून सर्व लूट एकत्र करण्यात आली. सर्व मिळून तीन सहस्त्र रुपये जमले. ही सर्व लूट या चळवळीतील वासुदेव बळवंतांचे उजवे हात, दौलतराव नाईक यांच्याकडे सोपवण्यात आली व त्यांनी ती पुण्याला धाडून दिली. पहारेकऱ्यांनी पोलीसचौकीवर खबर दिली. वासुदेव बळवंतांच्या सहकाऱ्यांचा पाठलाग सुरू झाला. पण हे सर्व लोक टेकडीवर आधीच चढून बसले होते. त्यांनी टेकडीवरून पाठलाग करणाऱ्यांवर गोळीबार सुरू केला. शेवटी निरुपायाने पाठलाग करणारे परत फिरले. पहिली मोहीम फत्ते झाली.

ही निव्वळ दरोडेखोरी किंवा लूटमार नव्हती. त्यामागे स्वातंत्र्यप्राप्तीचे उदात्त ध्येय होते. या चळवळीला काही किमान शिस्त लागावी म्हणून वासुदेव बळवंतांनी सुरुवातीपासूनच काही नियम घालून दिले. सर्व लूट एकत्र करून त्याचा चोख हिशोब ठेवायचा. या पैशाचा उपयोग शस्त्र-खरेदीसाठी आणि स्वराज्याच्या कामासाठीच करायचा. लुटलेला पैसा घरी न्यायचा नाही. गोरगरिबांच्या वाटेला जायचे नाही. स्त्रियांच्या अंगावर हात टाकायचा नाही. श्रीमंतांपुढे सुरुवातीला सामोपचाराने हात जोडून स्वराज्यासाठी पैसा हवा, अशी मागणी करायची. आणि स्वखुशीने पैसा मिळाला नाही तर चक्क लुटालूट करायची. या साऱ्या कामावर बारीक लक्ष ठेवण्याचे काम दौलतरावांवर सोपवण्यात आले. दौलतरावांची नजर अशी करडी होती की, कोणाची गैरप्रकार करण्याची हिम्मतच होत नसे. तो खऱ्या अर्थाने वासुदेव बळवंतांचा उजवा हात शोभला.

कोणत्याही गावात वासुदेव बळवंतांचे सहकारी शिरले की, सुरुवातीला गावातील गावकरी भीतीने पळू लागत. मग वासुदेव बळवंत त्यांना धीर देत. " घाबरू नका, आमचे तुमच्याशी कोणतेच वैर नाही. पोटासाठी लूटमार करणारे आम्ही दरोडेखोर नाही. स्वराज्याच्या कामासाठी आम्हाला श्रीमंतांकडून पैसा हवा. आम्ही तुमच्या वाटेला जाणार नाही. फक्त आम्हाला गावातील श्रीमंत जमीनदार यांची माहिती सांगा." गावकऱ्यांच्या मनातील भीती कमी व्हायची. मग गावकरी आपणहून त्यांचे स्वागत करत. कोणी दूध आणून देई. तर कोणी शिधा. पोलीसांचा पाठलाग चुकवत वासुदेव बळवंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांना दोन-दोन, तीन-तीन दिवस जंगलात, नाहीतर डोंगरदऱ्यात दडून रहावे लागे. पण

वासुदेव बळवंतांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पुढे गोर-गरीब सामान्य माणसांकडून चांगली साथ मिळाली. न मागता बिनबोभाट त्यांच्यापर्यंत भाकरीची रसद पोहोचत असे.

एकदा मोहीम यशस्वी होते म्हटल्यानंतर वासुदेव बळवंतांच्या सहकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढतच चालला. सुरुवातीला हे लूटमारीचे सत्र पुणे परिसरापुरतेच होते. पण हळूहळू या लोकांनी कोकणातही प्रवेश केला.

लुटालुटीच्या आणि सशस्त्र बंडखोरीच्या बातम्यांनी इंग्रजसरकारचे धाबे दणाणले. वासुदेव बळवंत या नावाने इंग्रजी अधिकाऱ्यांची झोप उडाली. ही नुसती लुटालूट नाही, तर यात इंग्रजी सत्तेला आव्हान असल्यामुळे, त्यांनी ही गोष्ट गंभीरपणे मनावर घेतली. वासुदेव बळवंतांना पकडण्यासाठी डॅनियल नावाच्या हुशार मेजरची निवड करण्यात आली. वासुदेव बळवंतांना पकडण्यासाठी सरकारने भलेमोठे बक्षीस जाहीर केले. सर्व वृत्तपत्रांकडे सरकारी निवेदन पाठविण्यात आले. " उंच, सडपातळ शरीरयष्टीचा, दाढीमिशा राखणारा, निळ्या डोळ्यांचा, इंग्रजी सफाईदारपणे बोलणारा, वासुदेव बळवंत फडके हा तरुण इंग्रजांविरुद्ध बंड करू पाहतो, त्याला पकडून देणाऱ्यास चार सहस्त्र मोहरांचे इनाम."

वासुदेव बळवंतांनी वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेली सरकारी घोषणा वाचली. इंग्रजी अधिकाऱ्यांचे लेखी स्वत:ची किंमत किती ? हे समजल्यावर त्यांना हसू आले. या सरकारी घोषणेस प्रत्युत्तर म्हणून त्यांनी स्वत:चेच एक घोषणापत्र वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी पाठवून दिले.

" इंग्रज सरकारने इथल्या लोकांची संपत्ती लुटून नेऊन, आम्हाला भिकेला लावले आहे. श्रीमंत लोकांविरुद्ध असलेली आमची मोहीम युरोपियनांविरुद्धही आहे. मला पकडण्यासाठी इंग्रज सरकारने पारितोषिके जाहीर केले आहे. मी पण माझी पारितोषिके जाहीर करतो. राज्याच्या राज्यपालाचे डोके उडवून आणून देईल त्याला पाच हजार रुपये इनाम. जिल्हाधिकाऱ्यांचे मस्तक आणील त्याला आठ हजार रुपये इनाम." आणि या प्रतिघोषणेच्या खाली मोठ्या झोकात सही होती. 'पेशव्यांचा शेवटचा सरदार वासुदेव बळवंत फडके.' सगळीकडे वृत्तपत्रांतून

गावांतल्या भिंतीभिंतींवरून एकीकडे सरकारी घोषणा तर दुसरीकडे वासुदेव बळवंतांची प्रतिघोषणा अशा जोडी-जोडीने झळकू लागल्या.

लोकांच्या मनांत वासुदेव बळवंत या नावाबद्दल भीतियुक्त आदर निर्माण झाला. स्वत:ला जे जमत नाही, ते हा माणूस करून दाखवत आहे. याबद्दल वासुदेव बळवंतांचे चोरून मारून इथल्या लोकांकडून कौतुकच होऊ लागले. इंग्रजी अधिकाऱ्यांचे डोके पिसाळल्यासारखे झाले. वासुदेव बळवंत या नावाने त्यांना वेडे-पिसे केले. त्यांना पकडण्यासाठी जंग जंग पछाडले. कुणीतरी अस्पष्टसे बोलायचे, ' वासुदेव बळवंतांना काल अमक्या तमक्या गावी पाहिले.' जरा थोडासा धागा मिळाला की, इंग्रज अधिकारी त्या सूतावरून स्वर्ग गाठण्याचा प्रयत्न करायचे. केवळ संशयावरून इंग्रज अधिकाऱ्यांनी कुणाही साधू आणि बैराग्याला अटक करावी आणि अखेरीस हा कुणीतरी तोतया आहे, असे निष्पन्न व्हावे. असे फजितीचे प्रसंग अनेक वेळा येत. लोक उघडपणे बोलत, ' वासुदेव बळवंत इंग्रजांना सहजपणे सापडायला इतके दुधखुळे नाहीत. त्यांनी कितीही अकांड-तांडव केले तरी वासुदेव बळवंत काही सापडणार नाहीत. '

फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या चळवळीने आता चांगलाच जोर धरला. वासुदेव बळवंतांना मोठ्या प्रमाणात लोकांनी साथ दिली असती, तर काहीतरी वेगळेच चित्र पहायला मिळाले असते. पण मनुष्य ठरवतो एक आणि प्रत्यक्षात घडते मात्र भलतेच. या कटू सत्याचा अनुभव वासुदेव बळवंतांना यायचा होता. पुढेपुढे अशा काही विचित्र घटना घडत गेल्या की, ज्यामुळे या एका मोठ्या उदात्त चळवळीला ग्रहण लागले.

***

# निराशेच्या खोल गर्तेत

१३ मे १८७९. पुण्यातील सुधारकांनी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे, स्त्रियांची वक्तृत्व-स्पर्धा. या काळाचा विचार करता चूल आणि मूल ही चौकट मोडून, स्त्रियांनी सभेमध्ये बोलण्याचे धाडस करणे, ही घटना खरोखरच क्रांतिकारक होती. पुण्यातील सनातनी मंडळींनी ही सभा होऊ नये, यासाठी बरीच खटपट केली. अडथळे आणण्याचा प्रयत्न केला पण तरीही सभा निर्विघ्नपणे पार पडली आणि लोक सायंकाळी घरी परतले. सभेत काहीही वादळ उठले नाही तरी सभा संपल्यानंतर निसर्गाचे थैमान सुरू झाले. जोरदार वादळ सुटले. ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट याने सारे वातावरण बदलून गेले. मुसळधार पावसाला सुरुवात झाली. रात्री केव्हातरी पाऊस थांबला आणि पुणे शहर गाढ झोपी गेले. आणि अचानकपणे रात्री अकराच्या सुमारास रस्त्यावर सगळीकडे आरोळ्या उठल्या. " आग, आग !" झोपी गेलेले पुणेकर खडबडून जागे झाले. बिछाने सोडून लोक गटागटाने रस्त्यावर गोळा झाले. सगळीकडे आगीच्या बंबांचे भयसूचक घंटानाद सुरू झाले. सोजिरांच्या बुटांचे आवाज घुमले. आग कुठे लागली ? कशी लागली ? लोकांत चर्चा सुरू झाली. लवकरच समजले की, पुण्यातील बुधवार पेठेतील विश्रामबागवाडा पेटला. लोकांचा घोळका काय झाले याचा शोध घेण्यासाठी तिकडे निघाला. पुणेकरांच्या दृष्टीने विश्रामबागवाड्याला ऐतिहासिक महत्त्व होते. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात तेथे शासकीय कार्यालय होते. नंतर त्याच जागी इंग्रजांच्या सरकारी कचेऱ्या आल्या. संपूर्ण विश्रामबागवाडाच आगीत भस्मसात व्हायचा

पण नगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या आणि सैनिकांच्या कुशलतेने अर्धा वाडा वाचला.

काय झाले ? कसे झाले ? याचा विचार करत लोक घरोघरी परतले. काही तास सरले. पुन्हा एकदा आरोळ्या. " आग, आग !" आता काय झाले ? लोकांना समजेना. थोड्याच वेळात समजले की, आता बुधवार-वाड्याला आग लागली. ही आग एवढी मोठी होती की, दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत धुमसत होती. आजूबाजूच्या काही वाड्यांना पण या आगीची झळ लागली.

पुण्यातील इंग्रज सरकारच्या कचेऱ्यांना आग कुणी लावली, याचा तपास सुरू झाला. वासुदेव बळवंत या नावाबद्दल इंग्रजांच्या मनात धडकी होतीच. लोकांत प्रचंड कुतूहल होते. त्यातच लवकरच वासुदेव बळवंत पुणे शहरात लुटालूट करणार अशी एक अफवा पसरली होती. पोलीसदल आणि सैनिक सतत जागृत असताना हे घडले, याचे लोकांना आश्चर्य वाटले. त्यांच्या कल्पनेला आता पंख फुटले. वासुदेव बळवंतांचेच हे काम. त्यांच्या चळवळीपुढे आता इंग्रजांचा निभाव लागत नाही, अशी लोकांत उघड-उघड आणि भाबडेपणाने चर्चा. त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांचा संशय बळावला. इंग्रजधार्जिण्या वृत्तपत्रांनी आकसाने वासुदेव बळवंतांचे नाव या अग्निप्रलयाशी जोडून दिले. अगदी ' लंडन टाइम्स ' या इंग्लंडमधील वृत्तपत्रानेपण अशीच चर्चा सुरू केली. वास्तविक पहाता, या अग्निप्रलयाशी वासुदेव बळवंतांचा काडीमात्र सबंध नव्हता. किंबहुना ते व त्यांचे साथीदार त्या रात्री पुण्यात सुद्धा नव्हते. पण या आगीचे निमित्त करून इंग्रजांना, वासुदेव बळवंतांना आणि बंडखोर पुणेकरांना झोडपण्याची संधी मिळाली. पुणेकरांच्या बद्दलचा इंग्रजांचा राग पुढे बराच काळपर्यंत टिकून होता.

वासुदेव बळवंतांना पकडण्यासाठी पुन्हा एकदा जोरदार मोहीम सुरू झाली. दरम्यानच्या काळांत आणखी काही विचित्र घटना घडल्या. मावळ-खोऱ्यात दौलतराव नाईक आणि त्यांचे सहकारी दडून बसले आहेत, अशी बातमी मेजर डॅनियलला समजली आणि त्याने तिकडे मोर्चा वळवला. बंडखोरांनी त्या वेळी ठिसूबाईच्या टेकडीचा आश्रय घेतला. डॅनियलचे सैनिक मागावरच होते. बंडखोरांनी टेकडीच्या माथ्यावरून सैनिकांवर गोळीबार सुरू केला. डॅनियल आणि दौलतराव यांच्यात हातघाईची लढाई सुरू झाली. यात

दौलतरावांच्या एका गोळीने डॅनियलच्या हनुवटीला जखम केली. पण डॅनियलने स्वतःला सावरून अगदी जवळून दौलतरावावर नेम धरला. आणि वासुदेव बळवंतांचा उजवा हात या चकमकीत कामी आला. दौलतराव पडलेले पाहताच त्यांचे सहकारी लूट तिथल्या तिथे टाकून चारी दिशांना पळत सुटले.

दौलतराव मारला गेला, या बातमीने वासुदेव बळवंत मनाने खचले. कारण दौलतरावच तर या चळवळीचा मुख्य आधार होता. त्यांची रामोशांवर विलक्षण जरब होती. आपल्यावर कुणाचे नियंत्रण नाही हे कळल्यावर काही रामोशांनी स्वार्थ साधून घेतला. वासुदेव बळवंतांचे नाव घेऊन मनसोक्त लुटालूट करावी आणि सगळी लूट आपसांत वाटून घ्यावी, असा प्रकार सुरू झाला. वासुदेव बळवंतांचे मन विषण्ण झाले. रामोशांचा त्यांना भरवसा वाटेना. ज्या उदात्त हेतूने या चळवळीचा घाट घातला, तो यापुढे किती प्रमाणात सफल होईल अशी त्यांना भीती वाटू लागली. सर्वच रामोशी अशा प्रकारचे नव्हते. पण काही थोड्यांच्या गैरकृत्याने चळवळच बदनाम होण्याचा धोका होता. शस्त्रास्त्रासाठी पैसा भरपूर मिळाला पण पुढे काय ? वासुदेव बळवंतांच्या मनातील मूळची विरक्त वृत्ती उफाळून आली. चळवळ अर्धवटच टाकून भगवी वस्त्रे धारण करून ते तीर्थयात्रेकरता निघाले. आता दैवी शक्तीशिवाय दुसरा कसलाही आधार नाही असे त्यांना वाटू लागले. सर्व प्रवास पायीच सुरू झाला. दिवस-दिवस अज्ञातवासात अन्नपाण्याशिवाय काढावे लागले. अंगात विलक्षण ताप होता. मजल दरमजल करीत ते दक्षिणेकडील श्रीशैल मल्लिकार्जुन या तीर्थक्षेत्री येऊन पोहोचले. बारा ज्योतिर्लिंगापैकी हे एक पवित्र क्षेत्र. या देवळात वासुदेव बळवंतांनी अनुष्ठान सुरू केले. अन्नपाणी वर्ज्य करून ते देवीपुढे ध्यान लावून बसले. देवीपुढे प्राणार्पण करायचे असा त्यांचा निर्धार होता. तत्पूर्वी त्यांनी स्वतःच्या आत्मचरित्राचा पहिला भाग लिहून पूर्ण केला. त्यात लहानपणापासूनचा सारा जीवनवृत्तांत लिहून काढला. तारीखवार निरनिराळ्या घटना लिहिल्या. आपण इंग्रजांविरुद्ध बंड करण्यास का प्रवृत्त झालो, याचाही उल्लेख केला. हे अर्धवट आत्मचरित्र पुढे अप्रकाशित राहिले.

मनाच्या कुठल्यातरी बेभान अवस्थेत एक दिवस ते देवीपुढे येऊन उभे राहिले. हातातील तलवार उपसली, आणि स्वतःशीच बोलल्यासारखे ते बोलू लागले.

“ देशभक्तीवाचून माझ्या मनात कसलीच भावना नव्हती, मग माझी चळवळ का

फसली ? माझ्या देशप्रेमाने ही देवी संतुष्ट झाली नाही का ? माझ्या शिरकमलाचा नैवेद्य चरणी अर्पण केल्यावर तरी ती प्रसन्न होईल का ?" असे म्हणत त्यांनी तलवारीने स्वत:चेच मस्तक तोडण्याची तयारी केली. पण ऐनवेळी देवळातील मल्लप्पा पुजारी तीरासारखा धावत आला. वासुदेव बळवंतांच्या हातातील तलवार त्याने काढून घेतली, कडक शब्दांत त्याने त्यांची कानउघाडणी केली.

" कसला हा अविचार ! आपण कुठल्या युगात वावरत आहोत ? या असल्या अघोरी कृत्याने का देवी प्रसन्न होणार ? तुमच्यासारख्या तरुण माणसाने असे जिवावर का उठावे ? "

वासुदेव बळवंतांनी त्यांच्या मनातील व्यथा बोलून दाखवली. " माझी चळवळ फसली. आता आत्मसमर्पणाशिवाय दुसरा मार्ग नाही.'

" असं का म्हणता ? रामोश्यांनी दगा दिला म्हणून धीर सोडू नका. इथल्या लोकांना हाताशी धरा आणि पुन्हा चळवळ सुरू करा. परमेश्वराचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत." पुजाऱ्याच्या शब्दाने वासुदेव बळवंतांना थोडा धीर आला. पुजाऱ्याने गावातल्या पाटलाला बोलावले. घडलेला सारा प्रकार सांगितला. पाटलाने त्यांना गुप्त ठिकाणी रहायला नेले. पुन्हा उठावणी कशी करता येईल, याच्या योजना आखल्या जाऊ लागल्या. महाराष्ट्रात जशी रामोशी, तशी दक्षिण भारतात रोहिल्यांची एक लढाऊ जमात. वासुदेव बळवंतांनी या रोहिल्यांच्या नायकाशी बोलणे सुरू केले. वाटाघाटी यशस्वी झाल्या. नायक इस्माईलखान याने आश्वासन दिले, " दरमहा दहा रुपये वेतन आणि फुकट अन्न येवढे मिळाले तर तुम्हाला वाटेल तेवढी माणसे चळवळीकरिता पुरवितो." लिंगायत, कोळी जमातीतील काहींनी वासुदेव बळवंतांना मदत करू असे सांगितले. वासुदेव बळवंतांच्या मनाने उचल खाल्ली. चळवळ नेटाने पुन्हा एकदा उभारायची असे त्यांनी ठरविले. पण विधिलिखित काही निराळेच होते. फंदफितुरीने डाव साधला आणि पुढे सारी चक्रे उलट दिशेने फिरू लागली.

***

# सिंह जाळयात अडकला

पुण्यातील बुधवार पेठेतील एक लहानसे देऊळ. पुराणासाठी म्हणून आजूबाजूच्या स्त्रिया जमल्या. पुराणिकबुवांचे पुराण संपल्यानंतर इकडे या बायकांचे, त्यांच्या सुना-जावयांचे पुराण सुरू झाले. वेळ घालवण्यासाठी इकडच्या तिकडच्या शिळोप्याच्या गप्पा असाच हा प्रकार पण बोलता बोलता एका बाईने सहज विषय काढला.

" इंग्रज सरकार किती वेडं आहे ? ते मारे वासुदेव बळवंतांना पुण्यात शोधतंय ! पण ते पुण्यात आहेत कुठं ?"

" पुण्यात नाहीत ? मग कुठं आहेत ?"

" अहो, ते आहेत गाणगापूरला."

" पण काहो हे तुम्हाला कसं कळलं ?"

" कसं म्हणजे काय ? दोनच दिवसांपूर्वी मी स्वत: गाणगापूरला जाऊन आले. तेव्हा मी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलं." स्वत:ला स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होता आले नाही, तर निदान असे गाफीलपणे बोलण्याची काही गरज नव्हती. पण बायकांच्या तोंडात तीळ भिजत नाही असे म्हणतात, त्याचा वाईट प्रकारे प्रत्यय या ठिकाणी आला. या लहानशा गोष्टीचे किती दूरगामी परिणाम होऊ शकतील, याची त्या बाईंना कदाचित् कल्पनाही नसेल. पण अखेर नको तेच झाले. त्या दिवशी पुराण ऐकण्यासाठी एका पोलीस-जमादाराची बायको आली होती. तिच्या मनाच्या कप्प्यात कुठेतरी ही महत्त्वाची बातमी साठवली गेली. या बाईने तिच्या नवऱ्याकडून ऐकले होते की, वासुदेव बळवंतांना पकडण्यासाठी खूप मोठे इनाम लावले आहे. तिने तात्काळ ऐकलेली बातमी नवऱ्याच्या

कानावर घातली. त्याने वरच्या अधिकाऱ्याला, असे करत करत ती बातमी थेट डॅनियलपर्यंत पोहोचली. डॅनियल हा अत्यंत हुशार आणि धाडसी म्हणून प्रसिद्ध होता. वासुदेव बळवंतांना जिवंत पकडून देणार अशी त्याने प्रतिज्ञाच केली होती. इंग्रज माणसाला गुप्त माहितीचा एवढासा धागा जरी मिळाला तरी त्या सुतावरून ते स्वर्ग गाठतात, हा यापूर्वीचा अनुभव होताच.

या पूर्वी इंग्रजांनी आणि स्वत: मेजर डॅनियलने वासुदेव बळवंतांना पकडण्यासाठी, हरप्रकारे प्रयत्न करून पाहिले होते. वासुदेव बळवंतांनी पुण्याच्या बिऱ्हाडाला कुलूप लावले आणि ते चळवळीसाठी बाहेर पडले, तेव्हापासून त्यांच्या तपासाबाबत अनेक लहानमोठ्या घटना घडल्या. इंग्रज अधिकाऱ्यांनी पुण्यात वासुदेव बळवंतांच्या घराचे कुलूप फोडले. घराची कसून झडती घेण्यात आली. त्यांच्या पत्नी जुन्नरला गेल्याचे शेजारच्या बाईने सांगितले. या बाईंचा शोध घेण्यासाठी काही मंडळी गेली. घराच्या झडतीत काही शस्त्रास्त्रे आणि नकाशे पोलीसांना मिळाले. या झडतीच्या बातमीला ' पूना ऑब्सर्व्हर ' आणि ' डेक्कन हेरॉल्ड ' या इंग्रजधार्जिण्या वृत्तपत्रांनी ठळकपणे प्रसिद्धी दिली. ज्या सरकारी कार्यालयात वासुदेव बळवंत काम करत, तिथूनही काही माहिती पोलीसांना मिळाली.

जुन्नरला बाई फडक्यांच्या मामांच्या घराभोवती गुप्त पोलिसांची सतत पाळत होती. शिरढोणला वासुदेव बळवंतांच्या वृद्ध वडिलांनाही, त्यांनी मुलाबद्दल काही गुप्त माहिती सांगावी म्हणून खूप छळण्यात आले.

हरप्रकारे प्रयत्न करूनही, इंग्रजांना वासुदेव बळवंतांचा ठावठिकाणा समजत नव्हता. पण पुण्याच्या बुधवार पेठेतील या घटनेमुळे हा गौप्यस्फोट झाला. आणि डॅनियल त्याच्याबरोबर निवडक कुमक घेऊन गाणगापूरच्या रोखाने निघाला. वासुदेव बळवंतांचे गुप्त हेर ठिकठिकाणी पेरले होते. गाणगापूरच्या रोखाने मेजर डॅनियल निघाला हे त्यांना समजले आणि त्यांनी लगेच गाणगापूरहून मुक्काम हलवला आणि ते पंढरपूरच्या रोखाने निघाले. मेजर डॅनियलने जाग-जागच्या पोलिस-अधिकाऱ्यांना सतर्क केले आणि तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली. निजाम राज्याच्या आणि विजापूर

जिल्ह्याच्या सरहद्दीवरून मेजर डॅनियल आणि वासुदेव बळवंत यांच्यात रोमहर्षक पाठलाग सुरू झाला.

पावसाळ्याचे दिवस होते. जुलै महिना म्हणजे तर पावसाचा ऐन बहर. वासुदेव बळवंतांच्या अंगात खूप ताप होता. पण अटक होण्याच्या भीतीने ते जीव मुठीत धरून पळत होते. गाणगापूरहून ते संगमावर आले. भीमा नदी दुथडी भरून वाहात होती. नदी पार करून डॅनियलला झुकांडी द्यावी असा धाडसी विचार त्यांच्या मनात आला. पुरातून पोहून जाणे हा तर त्यांच्या डाव्या हातचा मळ. पण त्या वेळचा तो पूर पाहून त्यांच्या मनातही धडकी भरली. नदीच्या पात्राकडे ते शून्य मनाने पहात होते. जवळच मिरासाहेब नावाचा नावाडी होता. वासुदेव बळवंतांनी त्याला विनंती केली,

" इंग्रज अधिकारी माझ्या पाठलागावर आहे. मला नावेतून नदीच्या तीरावर पोचवा."

" महाराज आपण म्हणता ते खरं आहे, पण या असल्या पुरात जीव धोक्यात कोण घालणार ?"

" अरे आता थांबायला वेळ नाही. तू जीव धोक्यात घालणार नसशील, तर मला ते धाडस करावे लागेल. मी या पुरात उडी टाकणार. काय व्हायचं असेल ते होवो."

" छे, छे, महाराज, असं नका करू. मी तुम्हाला नदीपार नेतो."

एक सामान्य नावाडी, पण त्याने अगदी मोक्याच्या वेळी वासुदेव बळवंतांना मोलाचे सहाय्य केले. त्याचे उपकार कसे फेडणार ? वासुदेव बळवंतांचे डोळे भरून आले. त्यांनी हातातले चांदीचे कडे नावाड्याला बक्षीस म्हणून देऊन टाकले. पण जाण्यापूर्वी सावधगिरी म्हणून ती नाव मोडून टाकली.

नदी पार केल्यावर बाकीचे सारे सहकारी मागेच ठेवले आणि फक्त गोपाळ मोरेश्वर साठे या एका सहकाऱ्याला घेऊन वासुदेव बळवंत पुढे निघाले. अक्षरश: तहान, भूक, विश्रांती सर्व विसरून ते जिवाच्या आकांतानिशी पळत होते. मजल दरमजल करीत ते विजापूर जवळील देवरनावडगी या लहानशा गावी २० जुलैच्या रात्री येऊन पोहोचले. गेले तीन दिवस आणि तीन रात्र

धावाधाव केल्यामुळे खूप दमछाक झाली होती. अंगात ताप होता. पुढे पाऊल टाकण्याचे त्राण नव्हते. रात्री याच गावी कुठेतरी मुक्काम करावा आणि सकाळी उठून हुलकावणी देत पुढील गावाला जावे, असा त्यांचा बेत होता. देवरनावडगीच्या चावडीवर ते आले, त्या वेळी मुसळधार पाऊस कोसळत होता. कुठेतरी रात्रीपुरता आश्रय हवा होता.

गावाच्या बाहेरील डोंगरात खोदलेला बुद्ध विहार होता. बुद्ध विहारात या दोघांनी प्रवेश केला, तेव्हा रात्रीचे दहा वाजले होते. अंधारात चाचपडत कशीतरी त्यांनी वाट शोधली. दोघांच्या बरोबर सामान फारसे नव्हतेच. वासुदेव बळवंतांच्याजवळ सांबराच्या शिंगापासून तयार केलेले मारा नावाचे हत्यार होते. गोपाळ मोरेश्वरांच्याजवळ एक तलवार होती. बरोबरच्या कागदपत्रांच्या भेंडोळ्यांची उशी करून वासुदेव बळवंतांनी जमिनीवर अंग टाकले. अंगालगत मारा नावाचे हत्यार होतेच. डोक्याचाच फेटा त्यांनी कुणाला ओळख पटू नये म्हणून चेहऱ्याभोवती आणि दाढीभोवती लपेटून घेतला होता. दिवसभराचा इतका शीण झाला होता की, जमिनीला पाठ लागताच त्यांना झोप लागली. पण त्या झोपेनेच त्यांचा घात केला. कारण दुर्दैव त्यांच्या पाठीशी हात धुवून लागले होते.

इकडे डॅनियल त्याच्या सहकाऱ्यांसह वासुदेव बळवंतांच्या मागोमाग संगमापाशी येऊन पोहोचला. ती तारीख होती २० जुलै. जवळपास मिरासाहेब हा एकटाच नावाडी होता. त्याला खोदून खोदून विचारल्यावर त्याने एक महाराज नुकतेच नावेतून नदीपार झाल्याचे सांगितले. पण नाव तर नष्ट करून टाकलेली. नदी पार कशी करणार ? पण डॅनियल मोठा हिंमतीचा होता. त्याने कोळी लोकांकडून पोकळ सुगडी जमा केली. ती आठ दमदार घोड्यांच्या पाठीला बांधून त्यांना पोहण्यासाठी सिद्ध केले. त्या पुरात तो घोड्यांसह उतरला. बरोबर सहकारी होतेच. गटांगळ्या आणि हेलकावे खात ते कसेबसे नदीपार झाले. खूप दमछाक झालेली. पण थांबायला वेळ नाही. वाटेमध्ये एकेक गाव मागे टाकत, मिळेल तेवढी माहिती घेत, ही सारी मंडळी मध्यरात्रीच्या सुमारास केव्हातरी देवरनावडगी गावात पोहोचली. गावकऱ्यांनी परगावचे वाटसरू असल्यामुळे बुद्ध विहारात मुक्कामाला राहिले असतील, अशी अर्धवट माहिती सांगितली.

त्या माहितीच्या आधारे डॅनियलची कुमक बुद्ध-विहाराच्या प्रवेशद्वारापाशी येऊन पोहोचली. प्रवेशद्वारापाशी तर सर्वत्र घनदाट अंधार होता. बाकीच्यांना बाहेरच थांबवून निवडक दोन सहकाऱ्यांसह डॅनियलने बुद्धविहारात प्रवेश केला. त्या तिथे अनेक प्रवासी दाटीवाटीने झोपले होते. कंदीलाच्या प्रकाशात डॅनियल एकेक व्यक्तीचा चेहरा न्याहाळू लागला. उंचीच्या आधारे डॅनियलने वासुदेव बळवंतांना ओळखले. चेहऱ्यावरचा फेटा थोडा दूर केला आणि ते वासुदेव बळवंत असल्याची खात्रीच पटली. डॅनियल खरोखरच लढाऊ वृत्तीचा होता. तो झटकन पुढे गेला. बुटाचा एक पाय त्याने तलवारीवर घट्ट रोवला आणि पुढे होऊन तो वासुदेव बळवंतांच्या छाताडावर बसला. डाव्या हाताने गळा धरत तो आनंदातिशयाने ओरडला, " उठा, वासुदेव बळवंत, मी तुम्हाला पकडले आहे. माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली." छातीवर दाब पडल्यामुळे वासुदेव बळवंत खडबडून जागे झाले. डॅनियलचा सहकारी अब्दुल हकने गोपाळ मोरेश्वरला ताब्यात घेतले. वासुदेव बळवंतांच्या सर्व प्रकार लक्षात आला. ते अत्यंत असहाय होते. पण




" अरे शूर आणि मर्द असशील तर असा भ्याडासारखा झोपेत असताना कशाला पकडतोस ?"

अंगातील रग त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांच्या तोंडी शरणागतीची भाषा नव्हती. उलट त्यांनी डॅनियलला प्रतिआव्हान दिले.

"अरे शूर आणि मर्द असशील तर असा भ्याडासारखा झोपेत असताना कशाला पकडतोस ? हिम्मत असेल तर माझ्याशी सरळ सरळ दोन हात कर." पण डॅनियलची ती हिम्मत झाली नाही. कारण त्याला माहीत होते की, वासुदेव बळवंतांशी दोन हात, म्हणजे सिंहाच्या जबड्यात उडी घेण्याचाच प्रकार. वासुदेव बळवंतांचे रक्त सळसळत होते. त्यांनी डॅनियलच्या तावडीतून निसटण्याचा निकराचा प्रयत्न केला. दोघांची बरीच झटापट झाली. पण डॅनियलने खूण करताच त्याचे इतर सहकारी धावून आले. दोघेही क्रांतिकारक एकाकी पडले. त्यांना साखळदंडांनी बांधण्यात आले. रोखलेल्या संगिनी आणि बंदुकींच्या वेढ्यात त्यांना चावडीवर आणण्यात आले. तिथे त्यांची झडती घेण्यात आली. त्यात एक पिस्तूल, एक तलवार आणि काही कागदपत्रे सापडली.

दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रांत वासुदेव बळवंतांना पकडल्याची बातमी ठळक मथळ्यांत झळकली. लोकांचा प्रथमत: या बातमीवर विश्वासच बसेना. असेल कुणीतरी तोतया. पुन्हा एकदा इंग्रजांची फट्फजिती झालेली दिसते. असेच त्यांना वाटले. पण दुर्दैवाने ती बातमी खरी होती. सिंह जाळ्यात सापडला होता.

***

# काकांनी पुण्याचे नाव राखले

२० जुलै १८७९ च्या मध्यरात्री वासुदेव बळवंतांना अटक झाली. त्यांना लवकरच पुण्यात चौकशीसाठी आणणार, अशी एक बातमी पसरली. इतके दिवस पुणेकरांनी सशस्त्र बंडात त्यांना फारशी साथ दिली नाही, पण आता त्यांच्या नावामागे एक क्रांतीचे वलय निर्माण झाले होते. पुण्याच्या स्थानकावर वासुदेव बळवंतांना पाहण्यासाठी ही प्रचंड गर्दी ! पण पोलीसांनी लोकांना चकवले. त्या सायंकाळी आधी कळविल्याप्रमाणे वासुदेव बळवंतांना पुण्यात आणलेच नाही. लोक वाट पाहून निराश मनाने घरोघरी परतले.

२३ जुलैला अचानकपणे वासुदेव बळवंतांना पुण्यात आणण्यात आले. ते गाडीतून उतरले, त्या वेळी त्यांनी जटा वाढवल्या होत्या. मूळचे गोरेपण उन्हामुळे आणि भटकंतीमुळे बरेचसे काळे पडले. कच्च्या कैदेत असताना वासुदेव बळवंतांचा अतोनात छळ झाला. इतका की, त्यांनी खिडकीच्या गजाला गळफास लावून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण पहारेकऱ्याचे लक्ष गेल्यामुळे तो फसला.

२२ ऑक्टोबरपासून वासुदेव बळवंतांच्यावरील खटल्याच्या सुनावणीला सुरुवात झाली. त्यांना पाहण्यासाठी सकाळपासून न्यायालयामध्ये गर्दी लोटली होती. न्यायालयात सर्वत्र कडेकोट बंदोबस्त होता. सरकारी वकील आणि चौकशीशी संबंधित एवढ्यांनाच फक्त न्यायालयात प्रवेश देण्यात आला. पत्रकारांनाही सुनावणी ऐकण्यासाठी आत सोडण्यात आले नाही. सरकारच्या

वतीने खटल्याचे काम चालविण्यासाठी एक ज्येष्ठ कायदेतज्ञ नानाभाई हरिदास हे होते. दंडाधिकाऱ्यांनी सुरुवातीलाच विचारले,

" वासुदेव बळवंतांचा बचाव कोण करणार ?"

" मला माहीत नाही महाराज " असे म्हणत सरकारी वकील हात झटकून मोकळे झाले. सगळीकडे एकच सन्नाटा निर्माण झाला. काही क्षण तसेच गेले. सर्वांची उत्सुकता शिगेला पोहोचली. काय ? वासुदेव बळवंतांचे वकीलपत्र घ्यायला कोणीही पुढे येत नाही ? पुणेकरांची अस्मिता कुठे गेली ? एका थोर क्रांतिकारकाला पुणेकर असे वाऱ्यावर सोडणार ? पुण्याचे नाव राखणारा एकही हरीचा लाल पुढे येऊ शकत नाही ? तितक्यात न्यायालयाच्या प्रवेशद्वाराशी काहीतरी हालचाल जाणवली. सर्वांच्या नजरा तिकडे वळल्या. एक मध्यमवयीन व्यक्ती, अगदी साध्या खादीच्या जाड्या-भरड्या पोषाखातील पुढे आली आणि शांतपणे तिने जाहीर केले,

" आरोपी क्रमांक १ वासुदेव बळवंत फडके यांचे वकीलपत्र घेण्यासाठी मी आलेलो आहे. "

या वाक्याने दंडाधिकाऱ्यासह सारेचजण चपापले.

कोण हा तेजस्वी पुरुष ? सर्वत्र कुजबूज सुरू झाली. पण जाणकारांनी बरोबर ओळखले. कारण ती व्यक्ती तशी पुणेकरांच्या अगदी चिरपरिचयाचीच होती. ते होते सार्वजनिक काका, काखोटीत नेहमी सार्वजनिक कामाच्या कागदपत्रांची भेंडोळी घेऊन रस्त्यावरून धिमे धिमे चालणारे, घरचं खाऊन लष्करच्या भाकरी भाजणारे म्हणून हेटाळणी केली तरी त्याकडे दुर्लक्ष करणारे, असे हे सार्वजनिक काका. काही जणांना वासुदेव बळवंतांचे उघडपणे वकीलपत्र घेणे म्हणजे शुद्ध वेडेपणा वाटत होता. सगळीकडे कुजबूज सुरू झाली.

" काका तुम्ही काय करता आहात याचा काही विचार केला आहे का ? याचे परिणाम काय होतील याची कल्पना आहे का ?" असे कुणी तरी

म्हणाल्यावर सार्वजनिक काका ताडकन् उदगारले, " होऊन होऊन परिणाम काय होईल ? त्या वासुदेव बळवंताप्रमाणे मलाही फासावर जावे लागेल एवढेच ना ? माझी या साऱ्याला तयारी आहे." सार्वजनिक काकांचे हे उद्‌गार पुणेकरांच्या मनावर कायमचे कोरले गेले.

खुद्द वासुदेव बळवंतांनाही आपले वकीलपत्र घ्यायला कोणी पुढे येईल, असे वाटले नव्हते. काकांनी वासुदेव बळवंतांची एकांतात भेट घेतली. बरीच चर्चा झाली. आणि त्यातून काकांनी सर्वस्व पणाला लावून वासुदेव बळवंतांची बाजू जोरकसपणे मांडायचीच असा पक्का निर्धार केला.

पुणेकरांचे हृदय अभिमानाने भरून आले. खटल्याचा निकाल काहीही लागो, पण एक समाधान मात्र निश्चित होते, काकांनी पुण्याचे नाव राखले !

***

म. वं. मं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २८७८ दिनांक ७/७/९४
विषय बा-वा. क्र. . . . . . .

# अखेरचा हा तुला दंडवत !

३ नोव्हेंबर, १८७९. पुणे येथील न्या. न्यूनहॅम यांच्या न्यायालयात वासुदेव बळवंत आणि त्यांच्या १४ सहकाऱ्यांवरील अभियोग सुरू झाला. प्रत्यक्ष न्यायालयात थोड्यांनाच प्रवेश असला, तरीही त्या आवारात प्रचंड मोठा जनसमुदाय जमला होता. या आद्य क्रांतिकारकाकडे पुणेकर काहीशा कुतूहलाने तर काहीशा कौतुकाने पहात होते. वासुदेव बळवंतांच्या बद्दलचा विलक्षण आदर तर युरोपियन अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत देखील दिसत होता. न्यायालयात वासुदेव बळवंतांना आणण्यात आले, तेव्हा सर्वांच्या नजरा तिकडे वळल्या. पांढरा अंगरखा, पायात तंग सुरवार, डोक्याला पांढरा फेटा, अंगात पांढरे जाकीट आणि त्यावर लपेटून घेतलेली शाल, वाऱ्यावर उडणाऱ्या दाढी आणि जटा. अशा वेषातील हा पुरुष म्हणजे जुन्या काळातील एखादा मानाचा सरदार आहे, असेच वाटत होते, आरोपी म्हणून न्यायालयात आणले असले, तरीही चेहऱ्यावर कुठेही अपराधीपणाची छटा नव्हती.

वासुदेव बळवंतांनी खटला ऐकायला आलेल्या प्रचंड जनसमूहाकडे नजर टाकली. या डोळ्यांतील आदरभाव पाहून त्यांचे मन प्रेमाने उचंबळून आले. पण त्यांचे दुसरे मन सांगत होते, ' या लोकांना माझ्याबद्दल इतका आदर वाटतो, पण मी बंड पुकारले, त्याच वेळी मला यांच्याकडून पुरेशी साथ का मिळाली नाही ? असे झाले असते तर चित्र काही निराळेच दिसले असते.'

सरकारच्या बाजूने अनेक साक्षी-पुरावे झाले. खुद्द वासुदेव बळवंतांचे मेव्हणे कुंटे यांना जबरदस्तीने वासुदेव बळवंतांविरुद्ध साक्ष देण्यासाठी उभे

केले. धाकदपटशा दाखवून आणि जबरदस्तीने काय बोलायचे हे त्यांना व्यवस्थित पटवले होते. पण ऐनवेळी हा साक्षीदार उलटला. तसे अनेकजण उलटले. आरोपीच्या बाजूने महादेव चिमणाजी आपटे या वकिलांनी वासुदेव बळवंतांच्या विरुद्ध साक्ष देणाऱ्या साक्षीदारांची कसून उलट तपासणी केली, आणि त्यातून अनेक विसंगत गोष्टी उघडकीस आल्या.

" या खटल्याच्या बाबत तुला काही सांगायचं आहे का ?" न्यायमूर्तींनी वासुदेव बळवंतांना विचारले. ते उठून उभे राहिले. जनता-जनार्दनाला अभिवादन करून त्यांनी बोलायला सुरुवात केली. " भारतीय जनता उपासमारीने मरत होती. आणि ब्रिटिशांना मात्र लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळत होत्या. रोजंदारीच्या मजुरांना फक्त दीड आणा मजुरी आणि काम मात्र चौपट. इंग्रजांचे धोरण मला संतप्त करीत होते. जे गरीब लोक उपासमारीने मरतात त्यांना मी कसा वाचवू शकेन, ही एकच चिंता मला लागून राहिली होती. ज्या भूमीचे पोटी आपण जन्मलो, तिच्याच पोटी ही लेकरे जन्मली. त्यांनी अन्नावाचून उपाशी मरावे आणि आपण कुत्र्याप्रमाणे पोट भरत रहावे, हे मला पहावले नाही. या साठी मी ब्रिटिशसरकार विरुद्ध युद्ध पुकारले.

हाती घेतलेल्या कार्यासाठी मी माझ्याकडची पै अन् पै खर्च केली. माझा देशाभिमान अतिशय जाज्वल्य होता. सरकारी नोकरीतून रजा घेऊन रामोशी, भिल्ल, कोळी यांना इंग्रज-सरकार-विरुद्ध सशस्त्र उठाव करण्यास सिद्ध करणे, हेच काम मी निष्ठेने पार पाडले. मी व्याख्याने देण्यास सुरुवात केली, पण त्यांचा काही उपयोग झाला नाही. अखेर मी नोकरीवर लाथ मारून स्वराज्यासाठी लूट करून पैसा मिळवण्याचे ठरवले. पुण्याचा खजिना लुटण्याची माझी योजना होती. पण तो बेत फसला. स्वातंत्र्य युद्धाचा देशात एकाच वेळी भडक उठला असता, तर रेल्वे, तारायंत्रे उखडली गेली असती, तुरुंग फोडून तिथल्या कैद्यांना मुक्त करून, त्यांच्या सहाय्याने युद्धाचा वणवा सर्वत्र पसरला असता. पण हे होऊ शकले नाही.

अहो, हिंदुस्थानवासी लोक हो, मी तुमच्या पाया पडून तुम्हाला शेवटचे वंदन करतो. तुमच्या हितासाठी मी माझे प्राण देईन. तुमचा वकील बनून देवाकडे

जाईन. ईश्वराच्या सभेत हजर झाल्यावर तुमच्यासाठी मी त्याला साकडे घालीन. मी ईश्वराला भीत नाही. मी त्याच्याशी भांडणार आहे. त्याला हडसून खडसून जाब विचारणार आहे. तुम्हाला सुखी करावे म्हणून मी त्याला हात जोडून प्रार्थना करणार आहे."

वासुदेव बळवंतांचे ते देशभक्तीने ओतप्रोत भरलेले निवेदन ऐकून अनेकांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. न्यायाधिशांच्या भाषणानंतर पंच-मंडळी विचार-विनिमयासाठी आतल्या खोलीत गेली. खटल्याचा निकाल काय लागणार, या बाबत जमलेल्यांत उलट-सुलट तर्क लढवले जात होते. पण काही तरी शिक्षा होणार, हे अपेक्षित होतेच. बहुधा फाशी, असेच साऱ्यांना वाटत होते. पण प्रत्यक्षात फाशीपेक्षाही भयंकर अशी जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. खटल्याचा निकाल ऐकण्यासाठी वासुदेव बळवंतांचे वृद्ध वडील बळवंतराव फडके आले होते. निकाल ऐकून त्यांच्या मनाची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना करता येते. बंडखोर पुत्राचे त्यांनी दुरूनच दर्शन घेतले, त्याच्याशी प्रत्यक्ष बोलण्याचे, त्याचे सांत्वन करण्याचे बळ, त्यांच्या अंगी उरले नव्हते. त्यांनी फक्त त्या्च्या पाठीवरून ममतेनं हात फिरवला. वासुदेव बळवंतांना स्वतःच्या पत्नीला आणि मुलीला सुद्धा भेटता आले नाही.

जन्मठेपेवर जाताना वासुदेव बळवंतांना निरोप देण्यासाठी प्रचंड मोठा समुदाय जमला होता. त्यामध्ये काही युरोपियन स्त्रियाही होत्या. एकीने तर उघड उघड हातात गुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. माजगावच्या धक्क्यावरून बोट निघण्याच्या काही सेकंदच आधी, एका भक्ताने वासुदेव बळवंतांच्या हाती कसली तरी पुडी दिली. त्या पुडीत काय होते ? पुडीत होती या भूमीची एक मूठभर माती. ती भेट पाहून वासुदेव बळवंतांचे मन उचंबळून आले. जन्मठेपेवर गेलेला कैदी जिवंतपणे परत आला, असा प्रकार कधी घडल्याचे ऐकले नव्हते. पुन्हा मातृभूमीचे दर्शन घडेल की नाही, हे माहित नाही . पण विजनवासातही या देशातील मातीचीच अखेर सोबत लाभणार, हा आनंदही होता. त्यांनी मोठ्या भक्तीभावाने ती माती कपाळाला लावली.

***

# केवढे हे धाडस !

३० जानेवारी १८८०. ' तेहेरान ' या बोटीने दुपारी २.३० वाजता, हिंदुस्थानचा किनारा सोडला. ही बोट वासुदेव बळवंतांना मातृभूमीपासून दूर घेऊन चालली होती. अगदी कायमचेच. जन्मठेप. काळ्या पाण्याची शिक्षा सुरुवातीला अंदमानला भोगायची असे ठरले होते. पण अंदमानात त्या वेळी १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धातील बरेच राजबंदी होते. वासुदेव बळवंतांना तिथे पाठवले तर राजबंद्यांनाही ते क्रांतिकारक विचारांनी भडकावून देतील, अशी भीती सरकारला वाटली. आणि मग अंदमानापेक्षाही अधिक सुरक्षित अशा एडनला त्यांची रवानगी करायची असे ठरले. सरकारने असे भासविण्याचा प्रयत्न केला की, अंदमानपेक्षा एडनला पाठवून आपण वासुदेव बळवंतांवर उपकारच केले आहेत. प्रत्यक्षात एडन द्विपकल्पाचे हवामान अंदमानपेक्षाही खराब असल्याने, जन्मठेप भोगणाऱ्या राजबंद्याला ते आणखीनच त्रासदायक !

एडनच्या तुरुंगात असताना वासुदेव बळवंतांना कोणत्या यातना-चक्रातून जावे लागले ? आपला इतिहास या बाबतीत अगदी मुका आहे. या संबंधात फारच थोडी माहिती प्रकाशात आली. पण नंतरच्या काळात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे ' माझी जन्मठेप ' पुस्तक प्रसिद्ध झाले, त्यावरून जन्मठेप शिक्षा म्हणजे केवढे अग्निदिव्य आहे, याची सर्वांना कल्पना आली. आपल्या ज्वलंत देशभक्तीचे मोल वासुदेव बळवंतांना रक्तामांसाने मोजावे लागले. शिक्षेच्या अगदी पहिल्याच दिवसापासून त्यांना रोज २५ पौंड धान्य दळण्याचे म्हणजे चक्की पिसण्याचे काम देण्यात आले. छाती फुटून जावी इतक्या मेहनतीचे हे

काम. एवढे प्रचंड काम करून पोटात अन्न मात्र जेमतेम जगण्यापुरतेच. त्या अन्नात सुद्धा काय काय भयंकर मिसळले असेल, याचा विचारही करवत नाही. तुरुंगात प्यायला पाणी देण्यात येत असे, ते डुकराच्या कातड्यांच्या पिशवीतून. खरोखरच जीवनाचा उबग यावा असाच तो सारा प्रकार होता. " दुसऱ्याने शिजवलेले अन्न मी खाणार नाही. डुकराच्या कातडीच्या पिशवीतील पाणी पिणार नाही." असे वासुदेव बळवंतांनी तिथल्या अधिकाऱ्यांना निक्षून सांगितले. सहा दिवस ते अन्न पाणी न घेताच राहिले. तिथल्या अधिकाऱ्यांनी तुमचा अर्ज वर पाठवून देतो, खटपट करतो असे सांगून वासुदेव बळवंतांचे मन कसे बसे वळवले व त्यांना मोठ्या आग्रहाने थोडे दही व खोबऱ्याचे तुकडे खाऊ घातले. पण वासुदेव बळवंतांच्या तक्रारीची योग्य ती दखल घेतली गेली नाहीच. चक्की पिसण्याच्या बरोबरीने आता तेलाच्या घाण्याला जुंपण्याचे कामही आले. जन्मठेपेतील छळ सोसणे आता शक्तीबाहेरचे होऊन गेले. कोठडीच्या गजातून बाहेर नजर टाकली तर भला मोठा तट दिसायचा. वासुदेव बळवंतांच्या मनात अनेकवार यायचे, ' हा तट ओलांडून पलीकडे कधी जाता येईल का ?' पण हे कसे शक्य आहे, असे वाटून खिन्न मनाने ते कोठडीतल्या कोठडीत येरझरा घालत. तिथून निसटून जाण्याचा घाट त्यांनी एका सहबंद्याच्या मदतीने घातला, पण त्यांच्या या गुप्त हालचालींचा सुगावा कसा कुणास ठाऊक, पण तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना लागला, आणि त्यांनी त्वरित हालचाल करून वासुदेव बळवंतांची कोठडी स्वतःच्या मुक्कामाच्या जवळ आणली व त्यावर पहाऱ्यासाठी कडक पहारेकरी नेमले. वासुदेव बळवंतांचे हात तर साखळदंडात जखडलेले होतेच, पण त्यांना आता पायबेड्याही घालण्यात आल्या. हा कैदी आता निसटून जाऊ शकणार नाही, अशी तुरुंगाधिकाऱ्यांना खात्री पटू लागली. वासुदेव बळवंतांवर पहारा करणारे, सुरुवातीला अती दक्ष असत. त्यांच्या बारीक सारीक हालचालींवर सतत लक्ष असे. पण ज्या अर्थी अजूनपर्यंत या कैद्याने निसटून जाण्याचा प्रयत्न केला नाही, त्या अर्थी आता फारसा धोका उरलेला नाही, असे त्यांनाही वाटू लागले असावे. नकळत हळूहळू त्यांच्या पहाऱ्यात थोडी ढिलाई येऊ लागली.

तुरुंगातून निसटून जाण्याचे विचार अगदी पहिल्या दिवसापासूनच वासुदेव बळवंतांच्या मनात येत असावेत. शिवाजी महाराजांचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर होता. औरंगजेबाच्या कडेकोट बंदोबस्तातून शिवाजी महाराजांना निसटून जाता येते, मग मला का जमू नये ? असे त्यांना वाटे. अखेरीस प्रत्यक्ष कृती करण्याचा दिवस उजाडला. १२ ऑक्टोबर १८८०. त्या दिवशी मंगळवार होता. दिवसभर त्यांच्याकडून अगदी चापून काम करून घेण्यात आले. अती श्रमामुळे त्यांची पाठ ठणकत होती. संध्याकाळचे जेवण झाल्यानंतर त्यांना कोठडीत बंद करण्यात आले. कोठडीला कुलूप लावून पहारेकरी थोडे दूर उभे राहिले. अधून-मधून तुरुंगातून तासाच्या घंटांचे टोल ऐकू येत होते. आणि त्या पाठोपाठ ' ऑल वेल ' असे पहारेकऱ्यांचे आवाज रात्रीच्या शांततेचा भंग करत होते. थंडीचे दिवस, काळीकुट्ट अंधारी रात्र. बाहेरचे पहारेकरी गाढ झोपी गेले होते. तुरुंगातून पळून जायचे असेल तर हीच संधी होती. वासुदेव बळवंतांनी एकवार डोळे मिटले. स्वत:च्या आवडत्या देवाचे, दत्तात्रेयाचे स्मरण केले. हातातल्या बेड्यांसह भारतमातेला वंदन केले. अंगातले सगळे बळ एकवटले, एक जोरदार हिसडा देऊन पायातल्या बेड्या सैल केल्या. आणखी एक झटका दिला, बेडी आणखी सैल झाली. बेड्यांचा आवाज न होऊ देता ते दरवाजापर्यंत आले. बिजागरीच्या लोखंडी खुंटीत बेडी वाकवली. बेड्या एकमेकांत अडकवून जोर करून त्यांनी मोठ्या कष्टाने स्वत:चे हात-पाय मोकळे करून घेतले. हात-पाय तर मोकळे झाले. त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला. बेड्या हळूवारपणे आवाज न करता कोपऱ्यात बाजूला ठेवल्या. कैद्याचा गणवेष उतरवला आणि स्वत:चा दुसरीकडून मिळवलेला पोषाख धारण केला. कोठडीच्या दरवाजाला भले मोठे कुलूप होते. पण त्यांनी पुन्हा एकदा अंगात होते नव्हते ते सारे बळ एकवटले. आणि दरवाजे बिजागरीतून उखडले. डोक्यावर कांबळे आणि खांद्यावर ते भले मोठे दरवाजे घेऊन ते कोठडीच्या बाहेर आले. झाल्या प्रकाराची चाहूल तशी कुणालाच लागली नव्हती. एडनमधील उंचच्या उंच टेकड्यांमुळे चंद्र कुठे दिसतच नव्हता. रात्रीच्या दीडच्या सुमारास ते तुरुंगाच्या तटापाशी आले. आता फक्त एवढी भिंत ओलांडली की सुटकाच. एवढी मोठी भिंत ओलांडणार कशी ? त्यांनी खांद्यावरची दारे शिडीसारखी एकावर एक अशी उभी केली. अर्धी भिंत अशा शिडीच्या सहाय्याने आणि उरलेली अर्धी

सावकाश सावकाश चढत ते तट चढून वर उभे राहिले. आजूबाजूला नजर टाकली. रात्रीचे तीन वाजले होते. अजून सर्वत्र सामसूमच होती. परमेश्वराचे नाव घेत त्यांनी तटावरुन उडी टाकली. क्षणभर ते अडखळले. पण कोठडीची दारे भिंतीपाशी उभी करून आणि मग डोक्यावर कांबळे घेऊन ते साऊथ गेट पर्यंत चालत आले. मेन गेटमधून माणसांची आणि उंटांची बरीच वर्दळ होती. याचा फायदा घेऊन ते तिथून बाहेर पडले. अक्षरश: वाट फुटेल त्या दिशेने ते पळत होते. कुठे जायचे, कसे जायचे, त्यांना माहीत नव्हते. फक्त इथून सुटायचे एवढेच ठाऊक होते. पहाटे चार वाजल्यापासून बारा मैल अंतर ते पळत होते.

सकाळी पहारेकरी सावध झाले, तो कोठडीचे दरवाजे जागेवर नाहीत. कोठडीतील कैदी सुद्धा फरारी. त्याच्या बेड्या तिथेच कोपऱ्यात पडल्या होत्या. तुरुंगातील भयसूचक घंटा वाजू लागल्या. सगळीकडे गहजब उडाला. बंदिवानाचा शोध घेण्यासाठी घोडेस्वारांचे पथक चारी दिशांना धाडण्यात आले. बंदिवानाला पकडण्यासाठी मोठी रक्कम जाहीर करण्यात आली. अजूबाजूचे



एडनच्या तुरूंगातून धाडसी पलायन

अरब उंटस्वार सुद्धा त्यांच्या बरोबर निघाले. एडन-परिसरातील प्रत्येक घर अन् घर तपासण्यात आले. वाटेत ठिकठिकाणी पोलीस-अधिकाऱ्यांना सतर्क करण्यात आले. पारितोषिकासाठी हपापलेले अरब वासुदेव बळवंतांच्या पाठलागावरच होते. एडनपासून जवळच्याच बीर अबेद या गावी वासुदेव बळवंतांना अरब स्वारांनी चोही बाजूंनी घेरले. थोडीशी झटापट झाली. पण तेवढ्यात् तुरुंगाचे अधिकारी आले. वासुदेव बळवंतांना ताब्यात घेतले. त्यांच्या हातांत पूर्वीपेक्षा जाड बेड्या ठोकण्यात आल्या. पोलीस-पहाऱ्यात पुन्हा एकदा वासुदेव बळवंतांना तुरुंगाच्या कोठडीत आणण्यात आले. इतर कैद्यांना वासुदेव बळवंतां-बद्दल कमालीचा आदर, ' या राजे, या महाराजे, ' अशा घोषात त्यांनी स्वागत केले. तुरुंगाचे अधिकारी चपापले. पूर्वीच्या पहारेकऱ्यांना काढून टाकण्यात आले. अधिक कठोर शिक्षा देण्यात आल्या. असे सांगतात की, पुन्हा या कैद्याने पळून जाऊ नये म्हणून त्याच्या तळपायाची कातडी सोलून काढण्यात आली.

एक फार मोठी धाडसी योजना पण अखेर फसली. शत्रूच्या हातावर तुरी देऊन पळून जाणारे अनेक वीर इतिहासाला माहीत असतील, पण स्वतःच्या ताकदीच्या जोरावर पळून जाण्याचा हा बहुधा एखादाच प्रयत्न असावा !

***

# अखेर मृत्यूनेच सोडवले

तुरुंगातून पळून जाण्याचा प्रयत्न केल्याबद्दल वासुदेव बळवंतांना पंचवीस फटक्यांची शिक्षा देण्यात येणार होती. पण त्या आधीच त्यांना अनधिकृत रीत्या इतकी मारहाण झाली होती की, त्यांच्या शरीरावर जागजागी जखमा झाल्या होत्या. तोफखान्याकडून खास तयार करून घेतलेल्या जाड-जूड लोखंडी बेड्या त्यांच्या पायांत घालण्यात आल्या. रात्री झोपताना सुद्धा त्यांच्या हातांत हातकड्या अडकवण्यात आल्या. त्यांना आता कोठडीत एकाकी ठेवण्यात आले. तुरुंगातील त्यांचे हाल सहस्त्र पटीने वाढले. अशा विचित्र परिस्थितीत वासुदेव बळवंतांनी पुढे सव्वादोन वर्षे कशी काढली असतील त्यांचे त्यांनाच माहीत. मोठ्या धैर्याने ते या साऱ्याला सामोरे गेले.

वासुदेव बळवंतांचे एके काळचे बलदंड शरीर ! पण रक्त ओकायला लावणारे अतोनात श्रम आणि भयंकर मानसिक यातना, याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होऊ लागला. ते वारंवार आजारी पडू लागले. दृष्ट लागावी अशी निरोगी शरीरसंपदा, पण जन्मठेप कैद्यांचा मित्र असलेल्या क्षयरोगाने त्यांच्यावर झडप घातली. दिवसेंदिवस ते शरीराने खंगत चालले. मांसाहार तर त्यांना वर्जच होता. वासुदेव बळवंतांच्या आजारपणाबद्दल अधीक्षकांनी वरच्या अधिकाऱ्यांना कळवले. पण त्यावर अशा बंदीवासात सुद्धा अपेक्षा करता यावी, तितकी त्यांची प्रकृती चांगली आहे असे लिहून आले. दिवसेंदिवस वासुदेव बळवंतांचे वजन कमी होत चालले होते. पण त्याची कुणाला फिकीर असणार ? वासुदेव बळवंतांचे मन अनेक वेळा आक्रंदून उठत असे, " यातून सुटका करून घेता

येणार नाही का ?" हा प्रश्न वारंवार ते स्वत:ला विचारीत, सुटका कशी करून घेणार ? एकदा सुटकेसाठी प्रयत्न केला पण तो फसला. सुटकेसाठी दुसरा कोणता मार्ग आहे का ? विचार करता करता त्यांना सुटकेचा आणखीन एक मार्ग सापडला. आता सुटकेचा एकच मार्ग उपलब्ध आहे, तो म्हणजे मृत्यू ! तोच आता साऱ्या यातनांतून मुक्त करणार. पण हवा त्या वेळी यायला मृत्यू सुद्धा दयाळू नाही. मृत्यू जर आपण होऊन यायला तयार नसेल, तर आपणच मृत्यूला सामोरे जायचे, असे त्यांनी ठरवले. दुसऱ्या दिवसापासून त्यांनी अन्न-पाणी वर्ज केले. दिवसभर अतोनात श्रम करायचे आणि अन्नपाणी घ्यायचे नाही, याचा काय परिणाम होणार ? वासुदेव बळवंत आपण होऊन मृत्यूच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करत होते.

वासुदेव बळवंतांच्या अखेरच्या दिवसांत फलटणचे डॉ. मनोहर बर्वे हे धन्वंतरी म्हणून काम करत होते. त्यांना वासुदेव बळवंतांबद्दल विलक्षण आदर होता. " एक वैद्यकीय अधिकारी म्हणून सांगतो की, तुम्ही हा अन्नत्यागाचा मार्ग सोडून द्या." असे ते परोपरीने विनवत. पण वासुदेव बळवंत आता औषधोपचारालाच नव्हे, तर साऱ्या जीवनालाच विटले होते. डॉ. बर्वे यांनी स्वत:च्या रुग्णालयात वासुदेव बळवंतांची देखभाल केली. त्यांची ढासळणारी प्रकृती लक्षात घेऊन त्यांना पथ्यकारक अन्न, तसेच दूध मिळावे यासाठी खटपट केली. अधिकाऱ्यांनी ही विनंती मान्य केल्याचे डॉ. बर्वे यांना समजले. ते तातडीने वासुदेव बळवंतांना भेटायला गेले. " दयाळू सरकारने माझी विनंती मान्य केली, आपल्याला या पुढे पथ्यकारक अन्न व दूध मिळणार." यावर वासुदेव बळवंत उदासपणे हसत म्हणाले, " इंग्रज सरकार कसलं आलंय दयाळू ? त्या पेक्षा वरचं सरकार अधिक दयाळू आहे. ते माझी याच काय, पण सर्वच यातनांतून सुटका करणार आहे."

अखेरच्या आजारात डॉक्टर बर्वे यांच्याशिवाय वासुदेव बळवंतांना जवळचे असे कोणीच नव्हते. त्यांनी वासुदेव बळवंतांना जगवण्याचा अटोकाट प्रयत्न केला. पण मृत्यूला सामोरे जायचे असा जिवाचा निर्धार झाल्यावर कोण काय करू शकणार? अंगात बोलण्याचे त्राण उरले नव्हते. पण कधीतरी स्वत:शीच बरळायचे.

" मी तर मरून जाईन. पण मेल्यानंतर सुद्धा या प्रजाभक्षक इंग्रजांना शांती लाभू देणार नाही."

अखेर तो दिवस उजाडला. १७ फेब्रुवारी १८८३. सकाळपासूनच परमेश्वराचे बोलावणे आले आहे, याची वासुदेव बळवंतांना चाहूल लागली होती. मातृभूमी खूप दूर राहिली. उराशी बाळगलेले स्वप्नही अपुरेच राहिले. दुपारी ४ वाजून २० मिनिटांनी मातृभूमीचे स्मरण करून या आद्य क्रांतिकारकाने एडनच्या तुरुंगात देह ठेवला. जवळपास कोणीच आप्त-स्वकीय नाहीत. तीन तासांत त्यांच्या नश्वर देहाला अग्नी देण्यात आला. आणि देहाची राख अरबी समुद्रात फेकून देण्यात आली. एक तेजस्वी ज्योत अनंतात विलीन झाली. पण तिने हजारो देशवासियांच्या मनांत स्वातंत्र्य-प्राप्तीचा आणि देशभक्तीचा स्फुलिंग चेतावला.

***

# गोपिकाबाईंची व्यथा !

क्रांतिकारकाची पत्नी होणे, हे खरोखरच अग्निदिव्यापेक्षाही भयंकर. अग्निदिव्य करत असताना, एकदाच काय त्या यातना होत असतील. पण इथे तर सबंध आयुष्यभर जळत राहायचे. आणि तेही निमूटपणे, समजून उमजून, कसलीही तक्रार न करता.

गोपिकाबाई या वासुदेव बळवंतांच्या द्वितीय पत्नी. वासुदेव बळवंतांचे प्रपंचाकडे कधीच लक्ष नव्हते. सारे आयुष्य क्रांतिकार्याला वाहून घेतल्यामुळे असे लक्ष देणे शक्य नव्हते. पण प्रथम पत्नीचा अकाली मृत्यू झाला. मुलगी मथू ही फक्त चार वर्षांची होती. या मुलीला कुणीतरी सांभाळायला हवे म्हणून वासुदेव बळवंतांना दुसरा विवाह करण्याचा विचार करावा लागला. पडघोलीचे काशीनाथशास्त्री कुंटे या पंडितांची मुलगी गोदू त्यांना स्थळ म्हणून सांगून आली. नंतरच्या काळात काशीनाथशास्त्री मुलीला घेऊन पुण्यात भिकारदास मारुतीजवळ व्यासांच्या वाड्यात रहायला आले. हा वाडा, ज्या भट गुरुजींच्या वाड्यात वासुदेव बळवंत रहात तिथून जवळच होता. कुंटे कुटुंबाकडे वासुदेव बळवंतांचे जाणे येणे होते. तेथे त्यांनी या मुलीला पाहिले होते. मुलीची पाठांतरशक्ती चांगली होती. घरातील सर्व कामे ती नीटनेटकेपणाने करे. अशी मुलगी चालून आल्यावर, वासुदेव बळवंतांनी कोणतेही आढेवेढे घेतले नाहीत. कुंट्यांच्या घरची गोदू फडक्यांच्या घरी गोपिकाबाई या नावाने ओळखली जाऊ लागली. त्या काळात मुलींचे विवाह फार लवकर होत. खेळण्या-बागडण्याचे वय. पण गोपिकाबाईंच्या शिरावर एक मोठी जबाबदारी येऊन पडली. घरात

शिकणारी धाकटी भावंडे, वासुदेव बळवंतांची नोकरीतील धरसोड वृत्ती, घरात मिळवणारे दुसरे कोणी नाही, अशा परिस्थितीत बाईंनी हाता-तोंडाची मिळवणी कशी केली असेल त्यांचे त्यांनाच माहीत !

प्रपंचातली कसली हौस मौज तर नाहीच, पण पतीचा पुरेसा सहवास सुद्धा नाही. वासुदेव बळवंतांनी पत्नीलाही संस्कृत शिकवले. पण बाई धाडसी होत्या. रामोशांना वासुदेव बळवंत मर्दानी खेळ शिकवत त्या वेळी त्या आपणहून म्हणत, " मला सुद्धा बंदुकीने नेमबाजी करायला शिकवा." त्यांनी दांडपट्टा चालवायला शिकून घेतला होता. वासुदेव बळवंतांची व्रतवैकल्ये आणि सोवळे-ओवळे कडक, पण हे बाईंनी सारे कौशल्याने सांभाळले. क्रांतीसाठी बाहेर पडण्यापूर्वीचा बाईंचा काळ तर चिंता करण्यातच गेला. रात्री-अपरात्री केव्हा तरी घरी यायचे आणि थोडा वेळ थांबून पुन्हा दिवसभर घराबाहेर. पोलीसांची सतत वर्दळ. ते वासुदेव बळवंतांचा ठाव-ठिकाणा विचारत. त्यांना मोठ्या हिमतीने परतून लावावे लागे. १८७९ च्या सुमारास तर वासुदेव बळवंतांनी सरळ सरळ निरवा-निरवीची भाषा केली. काही वर्षे घराबाहेर रहाण्याची परवानगी मागितली. डोळयांतील आसवं आतल्या आत जिरवत याही गोष्टीला त्यांनी मोठ्या मनानं परवानगी दिली.

जुन्नरला माहेरी असताना पतीबद्दल सतत काही ना काही तरी खळबळजनक गोष्टी कानावर येत. कित्येक दिवस बाईंच्या प्रत्येक हालचालीवर पोलीसांची बारीक नजर होती. रात्री-अपरात्री येऊन त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार होई. परकीयांचे सोडा, पण स्वकीय सुद्धा, " हीच ती वासुदेव बळवंत नावाच्या दरोडेखोराची बायको " म्हणून हिणवत. पण हा सारा त्रास, पतीची केव्हा ना केव्हा तरी भेट होईल, या आशेवर निमूटपणे सहन केला. पण एडनला जाण्यापूर्वी भेट होऊ शकली नाही.

जन्मठेपेवर गेल्यावर पतीबद्दल काही तरी समजेल, अशी भाबडी आशा त्यांच्या मनात होती. जन्मठेपेच्या बंदीवानाला घरी पत्र पाठवायला सुद्धा परवानगी नाही, मग भेट होणे तर दूरच राहिले. आणि एक दिवस एडन वरून डॉ. क्रुकशॉक यांची तार हाती आली ती अशुभ वार्ता घेऊनच. वासुदेव बळवंतांचा

मृत्यू. त्यांच्या वडिलांना उतार वयात फार मोठा धक्काच होता. गोपिकाबाई तशा खूप धीराच्या, पण एखाद्या उल्कापाताप्रमाणे असणाऱ्या या बातमीने त्यांच्याही मनाचा बांध फुटला. बराच वेळ रडून सुद्धा डोळ्यांतले अश्रू सरेनात. अवघ्या तीन वर्षांच्या सहवासानंतर हे अकाली वैधव्य आले. बोल कुणाला लावणार ? पण बाई कसल्यातरी निश्चयाने उठल्या. " तुमच्या मागून मी क्षणभरही जिवंत राहणार नाही." या पतीला दिलेल्या वचनाची त्यांना आठवण झाली. पती-पाठोपाठ स्वत:चे जीवन संपवण्याचा त्यांचा विचार होता. पण बळवंतरावांनी मोठ्या मिनतवारीने त्यांना या निश्चयापासून परावृत्त केले. नियतीचा खेळ किती विचित्र असतो. एकीकडे एक क्रांतिकारक स्वत:चे स्वातंत्र्याचे स्वप्न अपुरे राहिले म्हणून अतृप्त असताना त्याला अर्ध्या आयुष्यातून उठविले आणि दुसरीकडे दुसरा एक जीव, त्या क्रांतिकारकाची पत्नी " पतीमागून मी क्षणभरही जगणार नाही " असे म्हणत असताना तिला मात्र पतीच्या निधनानंतर पुढे ५७ वर्षे वैधव्यात रडत खडत जीवन काढावे लागले.

जिवंत असताना वासुदेव बळवंतांना अनेकांनी वेड्यांत काढले. " काय मिळवलं यानं ? सरकारविरुद्ध बंड काय सोपी गोष्ट आहे ? याने स्वत: काही मिळवलं नाहीच, ' पण स्वत:च्या बायका-मुलांना मात्र भिकेला लावलं.' अशी मुक्ताफळं अनेक वेळा गोपिकाबाईंना ऐकावी लागत. वासुदेव बळवंतांच्या मृत्यूनंतर या हौतात्म्याचे महत्त्व लोकांना पटू लागले. अनेक जण भेटून गोपिकाबाईंचे सांत्वन करून त्यांना धीर देत. पतीचे कौतुक ऐकायचा त्यांना आता वीट आला होता. कुणी स्तुती करायला लागला की, त्या उदासपणे म्हणत, " आता या स्तुति-सुमनांचा काय उपयोग ? ज्या वेळी त्यांनी इंग्रजांविरुद्ध बंडासाठी हाक दिली, तेव्हा त्यांच्या पाठीशी किती जण उभारले ? तसे झाले असते, तर माझ्या पतींना नाहक प्राणाला मुकावे लागले असते का ?"

वासुदेव बळवंतांच्या मागून त्यांच्या कुटुंबियांची वाताहातच झाली. त्यांचे मेव्हणे ऐन वेळी साक्ष देताना उलटले, म्हणून त्यांना कोवळ्या वयात अठरा वेताचे फटके मारण्यात आले. वासुदेव बळवंतांचे एक भाऊ कृष्णाजी बळवंत काही महिने तुरुंगात होते. दुसरे भाऊ पांडुरंग वकिलीची परीक्षा पास झाले, पण त्यांना इंग्रज सरकारने वकिलीची सनद नाकारली. सावत्र कन्या मथुताई हिचा

बाईंनी विवाह लावून दिला. पण त्याही १९३० साली अकाली वारल्या. वासुदेव बळवंतांच्या भावाची मुले बाईंनी कित्येक वर्षे सांभाळली. सर्व प्रकारचे आघात सोसूनही बाई सतत प्रसन्न असायच्या. पण येणाऱ्या-जाणाऱ्याशी फारच कमी बोलायच्या. आतून कुठेतरी त्यांची जीवनाबद्दलची ओढ संपलेली होती. पुढे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी बाईंची भेट घेऊन वासुदेव बळवंतांबद्दल, चळवळीबद्दल बरीच माहिती करून घेतली. सावरकरांच्या रूपाने वासुदेव बळवंतांचा वारसा पुढे चालविणारा कुणी तरी आहे, याचे त्यांना थोडे फार समाधान मिळाले असेल. अखेरीस १९४० साली वृद्धापकाळामुळे बाई हे जग सोडून गेल्या.

वासुदेव बळवंतांचे जीवन म्हणजे एक धगधगते यज्ञकुंडच होते. त्यांच्या जीवनाकडे पाहात असताना अगदी सहजपणे कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओळी ओठावर येतात -

" कशास आई भिजविशी डोळे उजळ तुझे भाल ।
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल ॥
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते ।
त्या ज्वालातून उठतील भावी क्रांतीचे नेते ॥
लोह दंड तव पायामधले खळा खळा तुटणार ।
आई, खळा खळा तुटणार ।
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ॥.

2166
वा. वा.

***

# वासुदेव बळवंत फडके यांचे न्यायालयातील निवेदन

" ब्रिटिशांच्या राजवटीत दुष्काळाच्या भीषण छायेत गोरगरीब जनता उपासमारीने मरत आहे. ज्या मातेच्या पोटी आम्ही जन्म घेतला, तिच्याच पोटी जन्मलेले हे भूमीपुत्र अन्नपाण्यावाचून मरावेत आणि आपण मात्र कुत्र्यासारखे पोट भरावे, हे मला सहन झाले नाही. या देशबांधवांचे प्राण कसे वाचवता येतील, याचाच मी सतत विचार करत होतो. माझ्याजवळ होता नव्हता तो पै अन् पैसा मी याच कामासाठी खर्च केला.

सरकारने दुष्काळी कामे सुरू केली, पण दिवसभराच्या कामासाठी फक्त अर्धा आणा मजुरी देऊन, दुष्काळग्रस्तांची चेष्टा करण्यात आली. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मोठ-मोठ्या पदांवर लठ्ठ पगाराच्या युरोपियन अधिकाऱ्यांची नेमणूक करून लाखो रुपयांची उधळपट्टी केली. हा पैसा आला कुठून ? तुमच्या आमच्या खिशांतूनच ना ?

अशा अनेक दुःखदायक घटनांवर मी दिवस-रात्र विचार करत होतो. या विचारांनी माझी झोप उडवली. त्यातूनच इंग्रजांची जुलमी राजवट उलथवून टाकायला हवी, या निर्णयाप्रत मी आलो. या विचारांच्या प्रसारासाठी सुरुवातीला मी व्याख्याने दिली. पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. व्याख्यानाला येणाऱ्या फारच थोड्यांनी भवितव्याचा विचार केला होता. मग रामोशी आणि कोळ्यांना हाताशी धरून मी लुटालूट केली. या पैशांतून मला स्वराज्याच्या कामासाठी सैनिक नेमायचे होते. पण माझी प्रकृती बिघडली. पुढे माझ्या नावाखाली रामोशांनी परस्पर स्वतःसाठी लुटालूट सुरू केली. त्यामुळे मी निराश झालो.

हे भारतवासीयांनो, माझे प्रयत्न निष्फळ ठरले. मी तुमची क्षमा मागतो. तुमच्या पायाला अखेरचे वंदन करतो. तुमच्या कल्याणासाठी मी माझ्या जीवनाचा त्याग करणार आहे. मी परमेश्वराला भीत नाही. तुमचा वकील बनून मी त्याच्याकडे जाईन. त्याला हात जोडून विनवीन, की माझे आयुष्य घे पण माझ्या देशबांधवांना सुखात ठेव."

# वासुदेवबळवंत यांच्या जीवनातील प्रसंग-विशेष.

| | | |
|---|---|---|
| १) | जन्म ( शिरढोण ) | ४ नोव्हेंबर १८४५. |
| २) | प्रथम विवाह | १८६०. |
| ३) | मातृवियोग | १८७०. |
| ४) | दुसरा विवाह | १८७३. |
| ५) | पूना नेटिव्ह स्कूलची स्थापना | १८७४. |
| ६) | महाराष्ट्रात दुष्काळ | १८७६ व ७७. |
| ७) | सशस्त्र बंडाच्या उठावणीला सुरुवात | २३ फेब्रुवारी, १८७९. |
| ८) | विश्रामबागवाडा व बुधवारवाडा आगीत भस्मसात | १३ मे, १८७९. |
| ९) | अटक | २० जुलै, १८७९. |
| १०) | जन्मठेपेसाठी एडनला रवाना | ९ जानेवारी,१८८०. |
| ११) | एडनच्या तुरुंगातून पलायन व परत अटक | १३ ऑक्टोबर १८८०. |
| १२) | एडनच्या तुरुंगात आत्मसमर्पण | १७ फ़ेब्रुवारी, १८८३ |
| १३) | गोपिकाबाई फडके यांचा मृत्यू | ११ सप्टेंबर, १९४० |

***



BVBK-0402877

# हे सुद्धा वाचायला हवे !

| | | |
|---|---|---|
| १) | आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे चरित्र | वि. श्री. जोशी. |
| २) | Vasudev Balwant Phadake First Indian Rebel against British Rule | V. S. Joshi. |
| ३) | अपुरं स्वप्न | शांता योगी. |
| ४) | वासुदेव बळवंत | ग. वि. बोडस. |
| ५) | आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्यावर कीर्तन | ह. भ. प. डॉ.पटवर्धनबुवा. |
| ६) | वासुदेव बळवंत | चारुशीला गुप्ते. |
| ७) | वासुदेव बळवंत | ना. स. करंदीकर. |
| ८) | वासुदेव बळवंत फडके | सुनील चिंचोळकर |
| ९) | आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके | द. दा. जोशी |
| १०) | दुर्दम्य | गंगाधर गाडगीळ |

***